# बडा पाणी

लीला मजुमदार

अनुवादः सविता जाजोदिया



nbt.india
एकः सूते सकलम्
नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया

₹ 45.00
ISBN 812372924-3
9788123729244
14150546
Bada Pani *(Marathi)*



nbt.india
एकः सूते सकलम्

नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया

*नेहरू बाल पुस्तकालय*


# बडा पाणी

**लीला मजुमदार**

अनुवाद
**सविता जाजोदिया**

चित्रे
**पुलक विस्वास**






ISBN 978-81-237-2924-4

प्रथम प्रकाशन : 1972 *(शके 1894)*

पुनर्मुद्रण : 1999, 2003, 2004, 2009 (दोनदा), 2012, 2013 (दोनदा), 2014 *(शके 1936)*



मूळ © लीला मजुमदार, 1972

मराठी अनुवाद © नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया, 1972



Bara Pani *(Original Bangla)*

Bada Pani *(Marathi Translation)*

₹ 45.00

संचालक, नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया

नेहरू भवन, 5 इन्स्टिट्युशनल एरिया, फेज-II

वसंत कुंज, नवी दिल्ली-110 070 यांनी प्रकाशित केले.

www.nbtindia.gov.in




# बडा पाणी

खालच्या दरीत दूरवर दिसणाऱ्या लाल कौलारू शाळेतून कनू बाहेर पडायचा. खळाळत वाहणाऱ्या ओढ्यावरील लाकडी पूल ओलांडून तो थेट डोंगराच्या माथ्यापर्यंत पळत जायचा. रविवारी आणि इतर सुट्ट्यांच्या दिवशी तो नानांबरोबर येथे येऊन मासे धरायचा. ते दोघेही डोक्यावर सावली राहील पण पायावर उन्ह येईल अशा बेताने पुलाखाली पडलेल्या सपाट खडकांवर बसायचे. नाना म्हणायचे की खडकांमधील उष्णता त्यांच्या पाठीच्या कण्यात शिरून त्यांच्या शरीराला ऊब देते. आणि त्यामुळे त्यांना खूप बरं वाटतं.

डोंगराच्या कडेला असलेल्या पायऱ्यांवरून घरी पोहोचायला कनूला बरोबर दहा मिनिटं लागायची. दहा पायऱ्या चढलं की मग वळून पाच पावलं चालायचं, पुन्हा



वळायचं आणि दहा पायऱ्या आणखी चढायच्या. अशा तऱ्हेने मुल्कीपर्यंत चालत जायचं. 'मुल्की' हे डोंगरमाथ्यावर एका कडेला वसलेल्या त्याच्या छोट्याशा गावाचं नाव होतं. कनूला आपल्या घराच्या खिडकीत बसल्याबसल्या धानखेतीच्या घाटापासून ते सर्वेक्षण कार्यालयापर्यंतचा सारा भाग दिसायचा. त्याचे बाबा तेथे काम करायचे. सध्या शहरातील मोठ्या कार्यालयात त्यांची बदली झाली होती.

कनू ज्या वाटेने घरी जायचा त्या वाटेवर बहुधा सर्व घरांच्या स्वयंपाकघरांच्या खिडक्या होत्या. मागीलदाराच्या लाल फाटकातून तो आपल्या घरात शिरायचा तोवर आज कुणाकडे काय जेवायला केलं आहे याची बित्तंबातमी त्याला लागलेली असायची.

कधी कधी त्याला तिथून जाताना बघून स्वयंपाकघरात काम करणारी मंडळी त्याला हाक मारायची. खिडकीपाशी बोलावून त्याच्या आईची खुशाली विचारायची किंवा त्याच्या बाबांचं पत्रबित्र आलं की नाही याची चौकशी करायची. कधी कधी ते त्याला खाऊ द्यायचे. ते तळलेले पदार्थ, वा मिठाई सावकाश खात खात तो वर जायचा. पण त्याच्या आईला हे अजिबात पसंत नव्हते. त्यांचं घर बंगल्याच्या मैदानी प्रदेशात अजय नदीच्या काठी होतं. तिथल्या चालीरीती अगदी वेगळ्या होत्या.

तिथली जमीन पोळीसारखी सपाट होती. तिथली माती लाल होती. तिथे गडद हिरव्या रंगाच्या 'शाल' वृक्षांच्या जंगलांतून उष्ण वारे वाहायचे. मार्च महिन्यात तर पळसाच्या झाडावर निखाऱ्यांसारखी फुललेली लाल लाल फुले अगदी कोसावरूनसुद्धा दिसून यायची. त्याला 'रानाची अग्निशिखा' म्हणायचे. कनूने कधी मैदान पाहिले नव्हते.

"आई, नाना....कुठे आहांत तुम्ही सारी? मला खूप भूक लागली आहे"....

हाका मारीतच कनूने अंगण ओलांडलं. परसाच्या तीन दगडी पायऱ्या चढून तो आत आला. त्याला पाहताच आई स्वयंपाकघरातून बाहेर आली. नाना आळशी मनीमावशीलाै व झिपऱ्या पहाडी कुत्र्याला थोपटीत आपल्या खोलीतून बाहेर आले. जिमी मिनिटभरदेखील स्वस्थ बसू शकत नसे.

"आज कोंबडीने किती अंडी दिली कनू?" नानांनी उत्सुकतेने विचारले. पण आईला ते आवडले नाही.

"पुरे झालं तुमचं काका. बाळाने अजून काही खाल्लं नाही की काही नाही. आणि तुम्हाला अंड्यांची पर्वा वाटतेय. एवढं काय त्या अंड्यांचे लागून गेलं आहे?"



आईची बोलणी ऐकून नानांचा चेहरा खर्रकन पडला. कनूने दप्तर एका बाजूला फेकलं आणि झेप घेऊन नानांच्या गळ्यात हात टाकले. नाना पडलेच असते पण सावरले.

"मला आहे ना अंड्यांची पर्वा." त्याने ओरडून म्हटले.

"नाना, आम्ही चौदा अंडी जमविली. खेरीज एक अंड फुटलंही होतं."


"वीस कोंबड्यांनी फक्त चौदा अंडी दिली वा छान!" आईने तोंड वेंगाडीत म्हटलं. "चांगला विनोद आहे. चल कनू, बूट काढ अगोदर आणि हातपाय धुऊन चहा घ्यायला ये. आज मी आपल्या बागेतील नव्या बटाट्यांची व मटारची भाजी आणि पुऱ्या केल्या आहेत. शिवाय नानांनी आज डोंगरावरून टोपलीभर रासबेरीची फळं वेचून आणली आहेत. उन्हाने पकडलेल्या गोड रासबेरी....चल, चल लवकर."



पांढऱ्या शुभ्र भिंती, लाल रंगाचे लोखंडी छत, आणि हिरव्या रंगाची दारं खिडक्या असलेलं आपलं घर कनूला फार फार आवडायचं. खाऊच्या सुट्टीत दुपारी शाळेजवळच्या ओढ्याकाठी तो आरामात बसला म्हणजे दूरवर उन्हाने चकाकणाऱ्या आपल्या घराच्या खिडक्यांची तावदाने त्याला दिसायची. त्याला वाटायचं ती तावदाने जणू हाक मारून सांगताहेत– "कनू ये. घरी ये. आम्ही सर्व तुझी वाट पाहात आहोत."

त्याच्या घराच्या मागच्या बाजूला बाग होती. यूबीन माळ्याने तेथे गोडगोड गाजरं, हिरवीगार कोबी आणि लालशार बीट लावलेले होते. बागेत जर्दाळू, पीच, नासपाती यांची झाडं होती. शिवाय रानटी सफरचंदाचंही एक झाड होतं. या झाडाची सफरचंदं तशी आंबटच होती. पण नानांनी ती ढलप्यावर भाजून काढली म्हणजे ती इतकी चवदार लागायची की काही विचारू नका. कनूचा नानांवर भारी जीव होता. नाना अठ्याहत्तर वर्षांचे होते. तेदेखील एखाद्या सुरकुतलेल्या लाल सफरचंदासारखे दिसायचे.

आई सांगायची, नानांशी काही आपलं खरंखुरं नातं नाही. ते तर कनूच्या आजोबांचे एक मित्र आहेत. आजोबा हयात होते तेव्हा नाना त्यांच्याबरोबर जंगल-खात्यात काम करायचे. पुढे आजोबा वारले आणि बाबा मैदानी मुलखातील मोठ्या शहरात काम करू लागले. बाबांचेदेखील नानांवर फार प्रेम आहे. ते नेहमी म्हणतात की नानांकडूनच त्यांना कितीतरी चांगल्या गोष्टी शिकायला मिळाल्या आहेत. तसे पाहिले तर नानांनी चौदाव्या वर्षीच शाळा सोडून जंगलखात्यात काम करायला सुरुवात केली होती. आजोबासारखंच त्यांनीही सुरुवातीला निरोप्या म्हणून आणि मग रानाचा राखणदार म्हणून काम केलं होतं.





## 2

"नाना, आज आपण काय करायचं?" कनूने विचारलं. 'आपण जी नवी गोफण तयार केली आहे त्याने यूबिन माळ्याच्या कबुतराला मारणाऱ्या ससाण्याची शिकार करायची का?"

आईने लगेच सावधपणे म्हटले, "छे, छे, ससाण्यासारख्या घातक पक्ष्याची शिकार करणं बरं नव्हे. कधी कधी काय होतं की ससाणा उलटून तुमच्यावरच हल्ला करतो. त्यापेक्षा त्या समोरच्या लिंबावरील कावळ्यांना का नाही मारीत? शी, ते तर किती घाणेरडे व चोरून खाणारे पक्षी आहेत."

नाना गप्प बसले होते. नंतर कनूला सांगितले, "ते साधेसुधे कावळे नाहीत. कनू, रानटी दरवडेखोरांच्या जातीचे कावळे आहेत. त्यांना पाळून बोलायला शिकवता येतं. त्यांचा आवाज मोठा विचित्र चिरका असा असतो. म्हाताऱ्या माणसासारखं तोंड मिटून त्यांना हसताही येतं. एकेकाळी माझ्यापाशी देखील तो कावळा होता." नाना बोलता बोलता थांबले.

कनूने लगेच विचारले, "पुढे काय झालं नाना? तुम्ही असे गप्प का बसला? सांगा ना. तुमच्या त्या कावळ्याला काय झाले? आजोबांनी तो कावळा पाहिला होता का?"

नाना पुन्हा सांगू लागले, "होय बाळ. तुझ्या आजोबांनी देखील तो कावळा

पाहिला होता. त्यावेळी आम्ही या मुल्की गावच्या वरच्या अंगाला जे रान आहे तेथे राखणदाराचं काम करीत होतो. एकदा काय झालं, सोसाट्याचा वारा सुटला आणि कावळ्याचं एक चिमणं पोर घरट्यातून खाली पडलं. त्याचं घरटं देवदाराच्या झाडावर खूप उंचावर होतं. तिथून तो जमिनीवर पडला. लाकूडतोड्याच्या एका मुलाला ते पिल्लू अगोदर दिसलं. तोवर त्या पिल्लाला पंख फुटलेले नव्हते. त्याचं गुलाबी शरीर चकाकणाऱ्या काळ्या कुळकुळीत केसांनी झाकलेलं होतं. ते मोठं छान दिसत होतं. थोडा वेळ ती पोरं त्या पिल्लाला खिशांत ठेवून मिरवली. मग बहुतेक आई रागावली वाटतं म्हणून पुन्हा त्या पिल्लाला त्यांनी देवदारवृक्षाखाली ठेवून दिलं. त्या पिल्लाची आई त्याला उचलून घरट्यात घेऊन जाईल अशी त्या विचाऱ्याची कल्पना असावी.

पण पक्ष्यांचं सारं वेगळंच असतं. पिल्लाच्या शरीराला जर मानवी स्पर्शाचा गंध आला तर ते त्याला पुन्हा आपल्यात घेत नाहीत. चोची मारमारून ते त्या लहानग्या पिल्लांना घायाळ करतात व घरट्याबाहेर फेकून देतात."

हे ऐकून कनूला फार वाईट वाटलं. उदास होऊन तो दोन मिनिटं गप्प राहिला. मग पुन्हा त्याने विचारले, "नाना, तुम्ही मग काय केलेत?"

"तुझ्या आजोबांनी त्या पिल्लाला आपल्या खिशात ठेवले. ते त्या देवदाराच्या झाडावर चढले. ते मोठमोठाले कावळे पंख फडकावीत त्यांच्यावर धावून आले. पण त्यांनी स्कार्फ हलवून त्यांना पिटाळून लावले. आणि त्या पिल्लाला अलगद घरट्यात ठेवून दिले. पण त्या पिल्लाच्या आईने लगेच त्याला खाली ढकलून दिले. मी जर त्याला वरचेवर झेललं नसतं तर नक्कीच ते खाली पडून मेलं असतं. त्याच्या हृदयाची धडधड माझ्या तळहाताला जाणवली. त्यानंतर मात्र मी त्या पिल्लाला कधीच माझ्यापासून दूर सारलं नाही.

मी त्याला घेऊन माझ्या घरी गेलो आणि बायकोला ते पिल्लू देत म्हटलं, 'तुला मूलबाळ नाही. तू या लहानशा पिल्लाला पाळ. तुला कधीही एकलेपणा वाटणार नाही.' तिने माझं म्हणणं ऐकलं. ते पिल्लू पाळलं. हळूहळू ते पिल्लू मोठं झालं. आता तो एक झक्कास कावळा दिसू लागला. तो चांगला गुबगुबीत होता. त्याला काळ्याभोर रंगाचे पंख फुटले होते. त्याचे लाल लाल डोळे माणकासारखे चकाकत असत. दिवसभर तो कुटुर कुटुर बडबडत असे."

"त्या पिल्लाला कुणी पाळलं होतं नाना? आणि सध्या ती कुठं आहे?" कनूने विचारलं.

"त्याला माझ्या बायकोनं पाळलं होतं. आणि सध्या ती देवाघरी राहते. तेथे सर्वजण खूप आनंदात राहतात. मी मात्र ती गेल्यापासून याच घरात राहतोय."





"नाना, तुमची बायको भारी वाईट असली पाहिजे. नाही का? तुम्हाला एकट्याला सोडून निघून गेली."

"छे, छे, ती फार चांगली होती. आम्ही त्या कावळ्याचं नाव स्नार ठेवलं होतं. जाताना त्याची देखरेख ठेवण्यासाठी ती मला बजावून गेली होती. मी बावीस वर्षं त्याच्यावर लक्ष ठेवलं. पण एके दिवशी सकाळी तो उडून गेला. त्यानंतर कधीही परतून आला नाही. आता स्वर्गात जेव्हा माझी बायको मला भेटेल तेव्हा तिला हे कसं सांगावं तेच मला समजेनासं झालं आहे."

कनू आश्चर्यचकित झाला. "म्हणजे तुम्ही स्वर्गात जाणार तिला भेटायला? तुम्हाला स्वर्गाची वाट माहीत आहे?"

कनूचा प्रश्न नानांना आवडला नाही. नाराजीच्या स्वरात त्यांनी उत्तर दिले,

"तिथली वाट काय मला सहज शोधून काढता येईल! आपल्याकडचे लहानमोठे नदी, नाले, ओढे नाही का वाहत जाऊन 'बडा पाणी' सरोवराची वाट सहज शोधून काढीत? बरं ते जाऊ दे. चल, आपण त्या ओढ्यात मासे धरू या. उद्या तुला सुट्टी आहे आणि शाळेत जायचं नाहीय."

आपापले गळ घेऊन दोघेही त्या छोट्या पुलावरून खाली उतरू लागले. पायऱ्यांवरून खाली उतरताना नानांचे गुडघे दुखू लागायचे. म्हणून त्या वाटेने

न जाता दोघेही वळणदार रस्त्यावरून निघाले. हेच नाना जेव्हा लहान होते तेव्हा एका दमात दोन दोन पायऱ्या चढून धावत वरपर्यंत जायचे. कधी कधी तर पाठीवर ओझं घेऊन सुद्धा ते चढायचे.

पुलाच्या खालच्या बाजूला मासे धरायची त्यांची एक खास जागा होती. वाळुंज वृक्षाच्या घनदाट पर्णराजीने तेथे छान सावली केलेली होती. जवळच एक सपाट खडक होता. उन्हाने तो गरम होऊन जायचा. नाना मुंगळ्यांची अंडी शोधून आणायचे. माशांना ती फार आवडायची. लगेच थवाच्या थवा गळापाशी गोळा व्हायचा. नानांना मासे धरायची सारी माहिती होती. पूर्वी आजोबांबरोबर आणि नंतर बाबांबरोबर ते येथे मासे धरायचे.

"कनू, फार लहान मासे कधी धरू नयेत. ती किनई माशांची मुलं असतात. पाहिलंस, पाण्यात ते कसे सैरावैरा धावत असतात. त्यांना धरून काय उपयोग ? त्यापेक्षा ते मोठे मासे पकडीत जा म्हणजे ते निदान शिजवून खाता तरी येतात. बाकीचे मासे तू पाण्यात पुन्हा सोडून देत जा." असे म्हणून नानांनी छोट्या माशाच्या गळ्याला अडकलेला काटा हलकेच सोडविला आणि तो मासा पाण्यात सोडून दिला.

"नाना, तुम्हाला सारेच प्राणी आवडतात का हो ? मासे, चिमण्या....सारे आवडतात ? किडे, मुंग्या आणि साप देखील आवडतात ?" कनूने उत्सुकतेने विचारले.

नाना हसले. म्हणाले, "किड्यांना आणि सशांना लांबून पाहणंच ठीक आहे. लाल रंगाची लांब लव असलेले किडे जीव वाचविण्यासाठी देवदाराच्या झाडावरून किती जलदीने ख़ाली उतरतात ते तू कधी पाहिलं आहेस का ? कनू, तू कधी हात लावू नकोस बरं. नाहीतर त्यांची ती लव तुझ्या हाताला चिकटेल आणि भयंकर त्रास होईल. पण एक मात्र आहे. तू जर थोडासा चुना हातावर टाकलास तर ती लव सहज निघून जाईल."

"आणि साप, नाना ?" कनूचा प्रश्न ऐकून नाना हसले. ते म्हणाले,

"थंडीच्या दिवसांत साप आपल्या बिळात शिरून तेथेच सुरक्षितपणे राहतात. तू जर त्यांच्या वाटेला गेला नाहीस तर ते तुला कधीही त्रास देणार नाहीत. माझ्या थोरल्या भावाने एकदा असंच डोंगरावर भटकत असताना एक मोठा दगड बाजूला सारला तर काय ? खालच्या खोल खड्ड्यात एक हिरव्या रंगाचा भला मोठा साप आरामात पडलेला होता. त्याचे चकाकणारे डोळे सताड उघडे होते. पण त्यात कसलीही चलबिचल नव्हती. दादाने तो दगड जसाच्या तसा पुन्हा ठेवून दिला आणि म्हटले 'ऊन्हाळा आला म्हणजे हा आपोआप जागा होईल.' 'त्यावेळी मी





त्यांना विचारलं. "पण याचे डोळे उघडे कसे ?" दादाने आश्चर्याने उलट मलाच विचारले, "म्हणजे? सापाला पापण्या नसतात हे तुला माहीत नाही वाटतं ? पापण्या नसल्याने त्यांना आपले डोळे मिटता येत नाहीत. ते जागे झाले म्हणजे कात टाकतात. त्यांची नवी कात फार नाजूक असते. ती इतकी मऊ असते की सापांना त्यामुळे हालचाल देखील करता येत नाही. त्यावेळी सापांना मारणं सोपं असतं."

"तर मग तुम्ही या सापांना त्यावेळीच का नाही मारीत ?" मी विचारलं.

"काय ? दादा म्हणाले," शत्रू दुबळा असताना त्याला मारायचं ? छे, छे, असं कधीही करायचं नसतं"

## 3

दिवेलागणी होईपर्यंत नाना बोलत होते–जुन्या काळच्या आठवणी! नुकत्याच घडलेल्या घटना सांगताना नानांचा घोटाळा व्हायचा. पण जुन्या आठवणी सांगताना त्यांच्याकडून अजिबात चूक होत नसे. सारं काही त्यांना अगदी जसंच्या तसं आठवायचं.

अंधार दाटू लागला तशी नानांनी आपले सामान गोळा केले. गळ काढला. नानांनी मध्यम आकाराच्याच पाच मासोळ्या पकडल्या होत्या. नानांच्या मदतीने त्यांच्यापेक्षा एक मोठा मासा कनूने पकडला होता. हवेत गारठा येत होता. पण खडक अजून काहीसे गरम होते. नानांनी उत्तरक्षितिजाकडे बोट दाखविलं. कनूने



पाहिले त्या बाजूला एखादया सुंदर चित्रासारखं दृश्य दिसत होतं. बर्फाच्छादित शिखरं आकाशाला स्पर्श करीत असल्यासारखी वाटत होती. आकाश निरभ्र असलं म्हणजे ही बर्फाच्छादित शिखरं कधी कधी दिसायची. भारावून कनूने विचारलं.

"नाना, आपल्याला कधीच का हो तिथं जाता येणार नाही? आजोबा कधी तिकडे गेले होते का?"

नानांनी मानेनेच नकार दिला. ती हिमशिखरं शेकडो मैल दूर होती. वाटेत इतर पर्वतमाला होत्या. जवळचे पर्वत हिरवे आणि दूरचे निळसर, मळकट असे दिसत होते. पण मुल्कीगाव या जवळच्या डोंगरावरच होते. इथली घरं व बागा फारच सुंदर होत्या. डोंगरउतारावरील रानटी बोरांची झाडं फळांनी डवरलेली असायची. कनू ती रानटी फळं वेचून आणायचा. त्या फळांचा मधुर वास आईला फार आवडायचा.

वळणावळणाच्या वाटेने घरी पोहचायला बराच वेळ लागायचा. नानांना धाप लागत होती. श्वास घ्यायला त्यांना दोन जागी थांबावं लागलं. नानांनी कनूला म्हटलं,

"डोंगरावर चढताना नेहमी तोंड मिटून ठेवलं पाहिजे. आणि श्वास नाकानेच घेतला पाहिजे. कनू, तू थोड्याच वेळात धापा टाकायला लागशील बरं!"

"पण तुम्हीदेखील धापा टाकीत आहात."

नानांना हसू आलं. ते म्हणाले, "अरे बाबा, माझं वय झालं आहे. मी ऐंशी वर्षांचा म्हातारा आहे. जोरात कुणाला नुसती हाक मारली तरी मला दमायला होईल. मी तर आता पैलतीराला नेणाऱ्या नावेची वाट पाहात आहे."

कनू आश्चर्याने थक्क झाला.

"नाना, डोंगरावर नाव कशी काय येणार? लहान लहान नद्या 'बड्या पाण्याला' भेटतात तिथपर्यंतच नावा येऊ शकतात असे गुरुजी सांगत होते."

क्षणभर विचार करून नाना म्हणाले, "तर मग मलाही त्या 'बडा पाणी'पर्यंत जावं लागणार असं दिसतंय."

"मी पण तुमच्याबरोबर येणार नाना."

"बाळ, तू तर अजून सात वर्षांचा फक्त आहेस. नाव तुला घेऊन जायची नाही. मी ऐंशी उन्हाळेपावसाळे घालविले. जगरहाटी पाहिली, खूप शिकलो, मेहनत केली, सुखदुःख भोगलं. मी रानातील वणवे विझविले, जुने वठलेले वृक्ष तोडून नवी रोपं

लावली. तुला ठाऊक आहे? एखादं झाड तोडलं किंवा एखादं झाड कोसळलं म्हणजे नेहमी एक नवीन रोप लावून टाकायचं असतं."

"का?"

"हे बघ. जुनी झाडं नुसतीच नाहीशी व्हायला लागली आणि नवीन झाडं लावली नाहीत तर हे डोंगर उघडेबोडके होतील. झाडं नसतील तर त्यांची मुळंही होणार नाहीत आणि मग खडकांवर माती कशी टिकून राहणार? भराभर कडे तुटतील, पहाड खचतील. शिवाय पाऊसही कमी होईल. आणि मग ही जागा ओस पडेल."

"नाना, तुम्ही आणखी काय काय केलं आहे?"

"का रे? तुला बेट्याला सगळी माहिती हवी. हे बघ मी अनेक प्राणी पाळले तसेच अनेक रानटी पशूंची शिकारही केली आहे."

"अरे वा! तर मग नाना तुम्ही चित्ते आणि अस्वलं देखील मारली असतील. तुम्ही त्यांच्यासाठी कशा प्रकारचा खोडा घातला होता?"

कनूचा प्रश्न ऐकून नाना नाराज झाले. ते म्हणाले,

"शूर माणसं निःशंकपणे फिरणाऱ्या प्राण्यांसाठी सापळा तयार करीत नसतात. तो भ्याडपणा आहे. सापळ्यात प्राण्याला पकडून त्याच्याशी दोन हात कसे करता येणार? खरी शिकार करायची तर त्यासाठी रानटी पशू मोकळाच हवा."

"पण मग रानटी पशू धरण्यासाठी जंगल अधिकाऱ्यांनी 'ले थोर रोड' वर सापळे कशासाठी लावले आहेत?"

"अरे ते तर चोरट्या प्राण्यांसाठी आहेत. मुल्की गावची कोकरं, कोंबड्यांची पिलं व छोटी डुकरं जे पळवून नेतात त्यांना पकडण्यासाठी आहेत. ती शिकार थोडीच आहे?"

"नाना, ते काय करतात? एखादं कोकरू तिथे बांधून ठेवतात. ते कोकरू बिचारं अंधाराला भिऊन जोरजोरात ओरडू लागतं आणि आपल्या आईला हाका मारू लागतं. मी त्याचा आक्रोश ऐकला आहे नाना! त्याचं ओरडणं ऐकून वाघ तिथे येतो आणि त्या बिचाऱ्याला खाऊन टाकतो." बोलता बोलता कनूचे डोळे पाण्याने भरून आले. ते बघून नानांना वाईट वाटले. ते म्हणाले,

"ए रड्या, उगाच काही तरी काय बोलतोस? तो काही पट्टयापट्टयांचा वाघ नसतो. ते तर मोठमोठाले ठिपके असलेले चित्ते असतात. वाघ या डोंगरापर्यंत



क्वचितच येतात. आणि ते कोकरू खात नसतात. चित्तेदेखील त्या कोकरापर्यंत पोचत नाहीत. त्याचं असं आहे की कोकराला एका वेगळ्याच पिंजऱ्यात बांधलेलं असतं. चित्ता जेव्हा सापळ्याशी येतो तेव्हा कोकरापाशी जाण्याकरिता पिंजऱ्याची कडी ओढतो. त्याबरोबर सापळ्याचा दरवाजा एकदम बंद होतो आणि चित्ता अडकतो. तो असा अडकला म्हणजे मोठमोठ्याने गर्जना करू लागतो. त्या ऐकून मुल्कीचे लोक तेथे जातात आणि त्याला पकडतात. त्यानंतर त्या कोकराला सोडून देतात. ते बिचारं भेदरलेलं कोकरू त्याच्या आईकडं धाव घेतं. ते अतिशय घाबरलेलं असतं, पण त्याला कसलीही इजा होत नसते. खरं सांगू, एखाद्याला शूरवीर व्हायचं असेल तर भय म्हणजे काय हे त्याला ठाऊक असायला हवं."

अशा प्रकारे मुल्कीतील दिवस जात होते. उन्हाळ्यात तेथे खूप पाऊस पडायचा. कधी कधी रात्रंदिवस मुसळधार पाऊस पडायचा. तर कधी कधी नुसतेच चार थेंब पडायचे. दूर क्षितिजापाशी निळे डोंगर ढगांनी झाकळलेले असायचे. घाटात ठिक-ठिकाणी पावसाळी झरे वाहू लागायचे. ते सर्व एकत्र जमून खळाळत खालच्या बाजूला जाऊन तेथे बडा पाणीमध्ये विलीन होऊन जायचे. कधी कधी रात्री कनूची झोपमोड व्हायची त्या वेळी त्याला छातीवरून थेंबाथेंबाने खाली जमिनीवर ओघळणाऱ्या पावसाच्या पाण्याचा टप् टप् असा आवाज ऐकायला यायचा. त्यावेळी त्याला आईच्या उठण्याची चाहूलही लागायची. ती त्या गळणाऱ्या पाण्याखाली एखादं भांडं



ठेवायची. झोपेच्या तंद्रीत कनूला भांड्यात पडणाऱ्या थेंबातून एकप्रकारचे संगीत ऐकू यायचे. ते ऐकता ऐकता तो पुन्हा झोपी जायचा.

कनू सकाळी जागा झाला तेव्हा पाऊस पडतच होता. आई उदास होती. कारण अजय नदीच्या काही मैदानी प्रदेशात राहणाऱ्या आपल्या आईची आठवण तिला होत होती. तिने कनूचे बूट कागदात व्यवस्थित बांधून पुस्तकांबरोबर ठेवून दिले आणि यूब्रिनबरोबर त्याला खाली पाठविले. कनू पाय घसरून कुठे पडणार तर नाही याची काळजी तिला वाटत होती. पावसामुळे रस्ते फारच निसरडे झाले होते.

"पाऊस जर असाच कोसळत राहिला तर अजय नदीला नक्कीच पूर येईल." आई म्हणाली.

"मग आजीचं घर वाहून जाईल का ग आई?" कनूने विचारले.

"छे, छे, आपलं घर पूररेषेच्या खूप उंचावर आहे."

"आई, धानखेती झऱ्याला पूर येतो. नाही का?" कनूने म्हटले,

"पैलतीरी जाण्यासाठी ठेवलेले मोठमोठे दगड आहेत ना ते देखील पाण्यात बुडतात. मग लंपेरिंगमध्ये लोकांना पैलतीरावर जाण्यासाठी खूप त्रास होतो. पण नाना म्हणतात की तासाभरात सारे काही ठीकठाक होईल. सारं पाणी त्या बडा पाण्यात मिसळून जाईल आणि तेथेच कधी तरी नानांना घेऊन जाण्यासाठी एखादी नाव येणार आहे."

आईने तोंड वेंगाडून म्हटले, "आमच्या गावात तर एकदा पाणी आलं म्हणजे कित्येक दिवस ओसरत नाही. खरं म्हटले म्हणजे या वेळी लोकांना नावेतूनच एका जागेहून दुसऱ्या जागी जावं लागलं. भाताची रोपं जर सात दिवस पाण्याखाली राहिली तर त्यांना श्वास घेता येत नाही आणि ती कोमजून मरतात. आमच्या त्या अजय नदीसमोर तुमचा धानखेती झरा अगदीच एखाद्या नाल्यासारखा दिसतो"

कनू गप्प राहिला. अजय नदी व सोनाली गावावर आईचं अतिशय प्रेम असल्याचं त्याला ठाऊक होतं. पण धानखेती झऱ्याने भातखाचरांचं कधी नुकसान होत नसतं. उलट लॅंकोर डोंगर उतारावर शेती करणारे लोक डोंगरातील झऱ्यांनाच कालवे काढून आपल्या भाताच्या खाचरांना पाणी देतात. झऱ्यांमुळे तर पीक वाढतं.



## 4

शाळेला आठवड्याची सुट्टी लागली. बहुतेक सर्व लोक सुंदर सुंदर रम्य झऱ्याकाठी वा पर्वतशिखरांवर वृक्षाखाली सहलीसाठी निघाले. कनू आणि शाम देखील नानांबरोबर लकोरच्या शिखरावरील लाकडाचा कारखाना पाहायला निघाले. एक भली मोठी गोल करवत मोठ्या मजेत पांढऱ्या लाकडावर खस्स् खंस्स् करीत चालत होती. लाकडाचा बारीक भुसा खाली पडत होता, कनू आणि शामने थोडासा भुसा हातात घेऊन पाहिला. त्याला मंद मधुर वास येत होता.

"हे पाहा, यात लाकडाचे तेल असते. त्यालाच हा मधुर वास येत आहे." लाकूडवाल्याने सांगितले. "हे आगकाड्यासारखं जळतं. देवदारच्या सर्व मोठमोठ्या झाडांमध्ये हे तेल असतं. कधी कधी हे झाडांच्या चिरांमधून बाहेर ओघळतं आणि घट्ट होऊन जातं. उंच देवदार वृक्षाच्या खोडाला आणि फांद्यांना डिंकासारखा चिकटलेला पदार्थ तुम्ही पाहिला असेल. सूर्यप्रकाशात तो खूप चकाकतो. लाकडाच्या याच चिकापासून धूप तयार करतात."

नानांनी म्हटले, "मुलांनो, याच्यामुळेच रानाला आग लागते. हिवाळाभर झाडं सुकत जातात. मग मार्च महिन्यात जोराचे वारे वाहू लागले म्हणजे या वाळलेल्या



फांद्या एकमेकांवर घासल्या जाऊन ठिणगी पडते. व आग लागते. डोंगरात राहणारे लोक या वणव्याला फार घाबरतात. बापरे, मी जे दृश्य पाहिलं आहे ते जन्मभर मला विसरता येणार नाही."

हे ऐकून दोन्ही मुलांनी नानांना गराडा घातला आणि विचारलं, "कसलं दृश्य नाना?"

"का? जेव्हा वारं जोरात वाहू लागतं तेव्हा वाटतं की कुणी पंख्यानं आगीला वारं घालंतय आणि आग पाजळतंय. रानातल्या सुकलेल्या झाडांवर इतक्या लौकर आग पसरते जणू एखादा घोडा चौखुर उधळतोय. एका पाठोपाठ एक मैलोगणिक आग पेटत जाते आणि सारे रान भस्मसात करते. त्या वेळी डोंगरी गावचे लोक अरण्यरक्षकांच्या मदतीला धावून येतात आणि आग विझवायला मदत करतात."

शाम पहिल्यांदा डोंगरावर आला होता. त्याने कधीही वणवा पाहिलेला नव्हता. त्याच्या चेहऱ्यावरून तो घाबरल्याचे दिसून येत होते. कोरड्या ओठांवरून जीभ फिरवीत त्याने विचारले, "नाना, त्या आगीत गावकरी देखील भाजून मरतात का हो? आग विझवायला आगीचे बंब नसतात का?"

कनूने आगीच्या बंबाविषयी कधी काही ऐकले नव्हते. तो म्हणाला, "अरे वेड्या, रानचे राखणदार व गावकरी मिळून आग विझवतात. ते लोक झाडाच्या फांद्या तोडून टाकतात आणि मग काठ्या वगैरेंनी झोडपून आग विझवतात."

"होय." लाकूडवाल्याने म्हटले, "आग विझविण्याची हीच पद्धत इथे आहे. आगीचे बंब इथपर्यंत यायला तेवढे रस्ते कुठे आहेत? पंपाने मारण्यासाठी तेवढे पाणी कुठाय? ते काही नाही. आम्ही आमच्याच पध्दतीने आग विझवतो. शिवाय आम्ही इथे अग्निरेषा देखील ओढून ठेवतो."

शामने या अग्निरेषा पाहिल्या होत्या. पण त्यांचा उपयोग काय ते त्याला माहीत नव्हते.

त्याने विचारले, "अग्निरेषा कशा असतात नाना?"

नानांनी सांगितले, "लंपेरिंगची ही अग्निरेषा तुम्हाला डोंगराच्या त्या पलीकडच्या उतारावर पाहता येईल. डोंगरावरच्या पायथ्यापासून ते वर शिखरापर्यंत आणि पुन्हा दुसऱ्या बाजूला शिखरापासून खालपर्यंत झाडे तोडून एक रुंद असा पट्टा तयार करतात. यालाच अग्निरेषा म्हणतात. हा रिकामा पट्टा खूप रुंद असल्याने आग पट्टयाच्या



पलीकडे असलेल्या घरापर्यंत पोहोचू शकत नाही. जळण्यासारखे काहीही त्या पट्टयामध्ये नसल्याने अगीला पुढे जाता येत नाही. ती पट्टयापर्यंत येऊन आपोआप विझते. अशा तऱ्हेने लोकांची घरं आगीच्या भक्षस्थानी न पडता वाचतात."

नानांनी मान हलविली, त्यांच्या काळी पेटलेल्या एका वणव्याची त्यांना आठवण झाली होती. ते म्हणाले—

"कित्येकदा आमच्यासारखे जे लोक सहलीला येतात त्यांच्यामुळेही रानाला आग लागते. हे लोक कधी सिगारेट न विझवताच बेफिकिरपणे सुकलेल्या पाल्यापाचोळ्यावर टाकून देतात, तर चहा करण्यासाठी म्हणून लाकडं पेटवितात त्यामुळे आजूबाजूच्या वाळक्या फांद्या पेट घेतात. हे निष्काळजी लोक नेहमीच असे करतात.

मुलांनो, वणवा फार भयंकर असतो बरं. त्याच्या भीतीने हिंस्र श्वापदेदेखील थरथर कापतात. वाघ व हरिण एकमेकांना अजिबात इजा केल्याखेरीज जीव बचावण्यासाठी पळत सुटतात. मी हे स्वतः पाहिलं आहे. बरे, ते असो. आपण दुसरं काही बोलू या. या वणव्याच्या गोष्टीमुळे माझं मन अतिशय उदास होऊन जातं."

त्यानंतर ते सर्वजण लोखंडी तारांच्या दोराने विणलेलं जाळं बघायला गेले. डोंगरमाथ्यावरील जंगलात तोडलेलं लाकूड या दोराच्या साहाय्याने थोड्याच वेळात पायथ्याशी पोहोचविले जायचे. लोखंडाच्या तारा चांगल्या जाडजूड आणि बळकट होत्या. लाकडांनी भरलेले डबे वेगाने त्यावरून जा ये करायचे. डोंगरात इतक्या उंच जागेवर वीज नव्हती. पृथ्वीच्या गुरुत्वाकर्षणामुळे हे डबे या तारांवरून घसरायचे गुदामामध्ये हे डबे रिकामे झाले म्हणजे तारांच्या साहाय्याने ते पुन्हां वर ओढून घेतले जायचे.

तेथून परतताना त्यांनी झाडांच्या सावलीत उगवलेली 'फर्न' (एक प्रकारचे गवत) गोळा केली. या फर्नला नाजूक, बारीक रेषा होत्या आणि त्यास चांदीसारखे चकाकणारे तंतू होते. या चकाकणाऱ्या फर्नला हातावर घेऊन दाबावे तर हातावर त्यांचा पांढरा चकाकणारा छाप उठतो. त्यांनी 'मधुलता'देखील गोळा केल्या. यांची फुले लहान व पिवळसर असतात. यांचा मंद मधुर सुवास लोकांना थक्क करून टाकतो. एकदा का याचा सुवास आला म्हणजे त्याचा थांगपत्ता लागल्याखेरीज लोकांना चैन पडत नाही.

ते सर्वजण घरी आले तेव्हा त्यांचे हात रानफुलांनी भरून गेलेले होते. कनूने ती सर्व फुले आपल्या आईच्या मांडीवर ठेवली. शाम आपली फुले व फर्न घेऊन घरी गेला. आई हसून मधुलतेचा वास घेऊ लागली.

"अरे कनू", आई म्हणाली, "हिला तर आपल्या चाफ्याच्या फुलांसारखा वास येत आहे. एकदा तुझे आजोबा ब्रम्हदेशातील शरमौनच्या दाट अरण्यात गेले होते. तेथे त्यांना कसलासा अतिशय गोड वास आला. जोवर त्यांनी त्या नाजूक फुलांना शोधून काढले नाही तोवर त्यांना मुळीच चैन पडले नाही. त्या फुलांवर जांभळे ठिपके होते आणि एका मोठ्या झाडाखाली उगवलेली होती. त्यांना पानं नव्हती की हिरव्या फांद्या नव्हत्या. फक्त फूल होतं. ते सरळ जमिनीतून वर आल्यासारखं वाटत होतं."

"आई, आजोबांनी ती फुलं तोडून घरी नाही आणली?" कनूने विचारलं. ते ऐकून आई हसली व म्हणाली,—

"आणली होती बाळ. तुझ्या आजीसाठी त्यांनी ती फुलं तोडून आणली होती. आणि बागेतील आंब्याच्या झाडाखाली त्यांनी त्यांचे बी देखील लावले होते. मला अजून आठवतंय की लहानपणी मी झाडाखाली लावलेली ती फुलं पाहिली आहेत.

दर वर्षी थंडीच्या दिवसात ती फुलं उमलायची. फुलं कोमेजून गेली म्हणजे बरेच दिवस जमिनीवर काही सुद्धा दिसत नसे. त्यानंतर बऱ्याच दिवसांनी मातीतून पानांच्या कळ्यांसारख्या उगवायच्या आणि थोड्याच दिवसांत मोठमोठ्या पानांच्या रूपाने त्या उमलायच्या. ही पानं वसंत ऋतूत गळून पडायची पण लवकरच त्यांना हिरव्या रंगाच्या, फुलांच्या कळ्या लागायच्या. मी त्यांची काही कलमं इथे आणली होती पण इथल्या गारठ्यात ती तग धरू शकली नाहीत."

हे ऐकून कनूला वाईट वाटलं. तो म्हणाला, "आई, तू ती इथे आणायला नको होतीस. नाहीतर असं करायचं होतंस की मिस्टर होल्डरला देऊन टाकायची. म्हणजे त्यांनी आपल्या बागेतल्या काचेच्या घरात ती लावली असती. आपल्याला आपल्या बागेत मधुलता लावता येतील ना?"

"हो तर," आईने उत्तर दिलं. आणि आपल्या झोपायच्या खोलीच्या खिडकी-बाहेर मधुलता लावायला ती निघून गेली. एकदा तिथे ती लागली म्हणजे आईला दिवसभर त्याचा वास येईल.



# 5

फारच भयंकर रात्र होती ती. रात्रभर मुल्कीमधल्या कुणाच्याच डोळ्याला डोळा लागला नव्हता. एक वाघ पिंजऱ्यात अडकला होता. त्याच्या भयंकर गर्जनांनी लोकांचा थरकाप उडत होता. पोरं झोपायचं सोडून चित्ता बघायला धावली होती. आईला पसंत नव्हतं तरी कनू देखील नानांबरोबर गेला होता.

तेथे मशालींच्या उजेडात कनूने काळे ठिपके असलेला वाघ बघितला. रागाने गर्जत तो त्या मजबूत लाकडी पिंजऱ्यात येरझाऱ्या घालीत होता. मशालीच्या उजेडात त्याचे डोळे विलक्षण लकाकत होते. ती मादी होती आणि बरीच मोठी दिसत होती.

कनूचे डोळे चहूकडे कोकराला शोधीत होते. पण तो कुठेच दिसत नव्हता. त्याने नानांना त्याच्याविषयी विचारले. नाना हसून म्हणाले—



"अरे वेड्या, तो काय या चित्त्याची गंमत पाहायला इतका वेळ इथे थांबतो होय ?"

"नाना, आता लोक या चित्त्याला मारून टाकतील ? कनूने विचारलं.

"छे, छे, याला प्राणिसंग्रहालयात पाठवलीत. ही एक फार सुरेख वाघीण आहे." नाना गंभीर झाले.

"कनू, जरा इकडे तिकडे बघ बरं. तिचे छावे देखील जवळपास कुठेतरी असतील."

कनूने उत्साहाने विचारले, "वाघाचे छावे ?—कुठे आहेत नाना ?"

नानांनी काहीच उत्तर दिले नाही व कनूला घेऊन घाईघाईने घरी परतले. त्या रात्री कुणीच झोपलं नाही. रात्रभर ती वाघीण गर्जत होती. लोकांनी तिला खायला दुधात कुस्करलेली भाकर दिली, कोंबडीची पिल्लं दिली पण काही केल्या ती शांत होईना. बिछान्यावर पडल्यापडल्या कनू थरथरत होता. किती वाईट आहे—या लोकांनी वाघिणीला पिंजऱ्यात कैद करून टाकलं आणि तिचे छावे रानात एकटे आहेत. आता त्यांना कोण पाहात असेल ?"

दोन दिवसांनंतर नानांना रानाच्या कडेला मांजरीची दोन छोटी पिल्लं सापडली. त्यांच्या गुबगुबीत अंगावर खूप लव होती. त्यांच्या पांढऱ्या डोळ्यांमध्ये फिक्क्या राखी रंगाच्या छटा होत्या. देवदाराच्या पानांमध्ये ती इकडून तिकडे खेळत होती.



नाना त्यांना घरी घेऊन आले. आईने मायेने त्यांना उचलून घेतलं. आणि हळूहळू थोपटलं. मग तिने त्यांना दुधाचा कटोरा दिला. पण त्या पिल्लांनी लगेच तो सांडून टाकला. तेव्हा मग तिने कनूच्या लहानपणची दुधाची बाटली काढून आणली आणि पाळीपाळीने दोन्ही पिल्लांना बाटलीने दूध पाजले. त्या पिल्लांना जोरजोरात दूध पिताना पाहून कनूला खूप हसायला आलं.

सर्वजण आनंदात होते. मात्र त्यांचा कुत्रा आणि मनी मावशी काही खूष नव्हते. त्यांना स्वयंपाकघरात बांधून टाकलं म्हणजे तेथे ते रागाने गुरकायचे व थुंकायचे. आईने सांगितले—

"नव्या अनोळखी प्राण्याशी नीट मैत्री होईपर्यंत सर्व जनावरे त्यांचा राग करतात. आता ही काही वेगळ्याच प्रकारच्या मांजरीची पिल्लं आहेत यात शंकाच नाही."

"ही काही मांजरीची पिल्लं नव्हेत, वाघाचे छावे आहेत—" नाना आत येत म्हणाले. "तू यांना पाळशील का ?"

एव्हाना ती दोन्ही पिल्लं शेकोटीपाशी कांबळ्यात दडून झोपली होती. क्षणभर आई स्तब्ध राहिली. दोन्ही पिल्लं लोकरीच्या गुंड्यासारखी लोभसवाणी दिसत होती.

"अस्सं—" आई म्हणाली. "म्हणून ती वाघीण सारी रात्र गर्जत होती वाटतं. काही हरकत नाही. जोवर जंगल अधिकारी या पिल्लांना त्यांच्या आईकडे पाठविण्याची व्यवस्था करीत नाहीत तोवर आपण यांना पाळू या."

हे ऐकून कनूची फार निराशा झाली. तो म्हणाला—

"यांना तेथे पाठवण्याऐवजी आपणच पाळलं तर काय हरकत आहे ? तिथे पाठवलं तर यांनादेखील ते लोक पिंजऱ्यात कैद करून टाकतील."


लँकोर गावाहून तो म्हातारा दूधवाला कनूकडे दूध घालायला यायचा तो कनूचे बोलणे ऐकून थक्क झाला. बांबूच्या बालधांमधून तो मोठे चवदार आणि घट्ट, पांढरे-शुभ्र दूध घेऊन यायचा.

"काय म्हटलंत ? तुम्ही हे वाघाचे बच्चे पाळणार ? या जंगली जनावरांना पाळीव बनवणं कधी तरी शक्य आहे का ? एकदा रानाला आग लागली असता मला एक मांजराचं पिल्लू सापडलं होतं. मी ते घरी आणलं आणि पाळलं. ते मांजर दिवसेदिवस मोठं होत गेलं आणि त्याचं खाणं देखील वाढत गेलं. इतकं की काय करावं हेच माझ्या आईला व बायकोला समजेना. पण दिसायला ते इतकं गोड होतं की सर्वच

लोक त्याला प्रेमाने कुरवाळीत. लवकरच त्याच्या अंगावर राखी रंगाचे मोठमोठे ठिपके दिसायला लागले तेव्हा कुठे सर्वांना समजलं की ती वाघीण आहे.

पुढे एके दिवशी तिने माझ्या बायकोची लाडकी कोंबडी मटकावली. बिचारीची हाडं आणि पंखंदेखील तिने सोडले नाही. माझ्या बायकोला फार राग आला. शिक्षा म्हणून तिने तिला रात्रभर अंगणात बाहेर बांधून ठेवलं. सकाळी आम्हाला तिची दया आली. तिला सोडून घरात घेऊन यावं म्हणून आम्ही अंगणात गेलो तर काय? वाघीण बेपत्ता होती. चावून चावून तिने दोर तोडून टाकला होता आणि ती पळून गेली होती. आमचं कोकरू देखील नाहीसं झालेलं होतं. आजपर्यंत तिचा ठावठिकाणा लागलेला नाही. या रानटी पशूंना पाळणं महा कठीण आहे.”

जंगल अधिकारी वाघाचे ते छावे प्राणिसंग्रहालयात त्यांच्या आईपाशी सोडण्याकरिता घेऊन गेले. कनूला खूप वाईट वाटलं. तेव्हा त्याचं मन रिझविण्यासाठी



नानांनी त्याला देवदाराच्या झाडावर लागलेलं मधमाश्यांचं एक मोठं थोरलं पोळं दाखविलं. ते पोळं भुरकट रंगाच्या मोठ्या चेंडूसारखं दिसत होतं. तसं ते एकदम गोल नव्हतं. लांबट गोल होतं. पोळं दिवसेदिवस मोठं होत जायचं. एके दिवशी कनूला दिसलं की जमिनीवर मधाचे काही थेंब पडले आहेत. बरेचसे मुंगळे तेथे जमले आहेत.

एके दिवशी यूबिनला एक मधमाशी चावली. तेव्हा दूधवाल्याने आईला सूचना दिली की आता हे पोळं जाळून टाकायला हवं. नाहीतर घरात राहणं कठीण होईल. नानांनी जेव्हा हे ऐकलं तेव्हा ते फार नाराज झाले. त्यांचं म्हणणं होतं की, मधमाशीला जोवर कुणी त्रास देत नाही तोवर ती कुणाच्या वाटेला जात नाही. कपडे वाळत घालण्यासाठी यूबिनने त्या देवदाराच्या झाडाला दोरी बांधायला नको होती.



आईच्या परवानगीने रात्री तो दूधवाला गावच्या बऱ्याच लोकांना बरोबर घेऊन आला. एका लांबलचक काठीला एक मशाल बांधण्यात आली. मग त्या पोळ्याला आग लावण्यात आली. ते पोळं एकदम जळू लागलं. मेणाचं असल्याने त्याने फार लवकर पेट घेतला. अंधारात मधमाश्या इतस्ततः उडू लागल्या. अखेर ते पेटलेलं पोळं देखील खाली पडलं. गावकऱ्यांनी आग विझवली आणि पोळं उचलून घेऊन गेले. हे सर्व पाहून कनू रडू लागला. त्याने दूध देखील घेतलं नाही. नाना त्याला रागावले आणि म्हणाले, "बाळ, एकदा माझ्या हातून देखील चूक झाली होती. मी लहान होतो तेव्हाची गोष्ट. एकदा मी मुंग्यांच्या वारुळात पाणी टाकलं. बिचाऱ्या तडफडून इकडे तिकडे पळाल्या." हे ऐकून कनूला त्या मुंग्यांचीदेखील दया आली. त्यानं ओळखलं की नानांनादेखील त्या चुकीबद्दल वाईट वाटत आहे.

"कोळी फार वाईट असतो नाना. तो जाळं विणून माश्यांना खाऊन टाकतो. चिमण्यादेखील फार वाईट असतात. त्या किड्यांना खातात." कनूने म्हटले.

"लहान मुलं देखील वाईट असतात" नाना थट्टा करीत म्हणाले.

"कारण ती मासे, कोंबड्यांची पिल्लं आणि कोकरं मारून खातात. जगात कोणी ना कोणी दुसऱ्या कोणाला सतावीत असतंच. तर चल बघू. दूध पी आणि झोप."



## 6

बरेच दिवस कनूला वाघिणीच्या दोन पिल्लांची आठवण येत राहिली. त्याचा कुत्रा आणि मनी मावशी मात्र ती पिल्लं निघून गेल्यामुळे खूष झाल्याचे दिसत होते. मात्र ज्या ज्या कोपऱ्यात ती पिल्लं राहिली होती ते ते कोपरे ते दोघेही सारखे हुंगायचे. त्या पिल्लांची उणीव कनूला खूप जाणवतेय हे आईला ठाऊक होतं.

"कनू, मी तुला बारा नंबरच्या सर्वेक्षण पार्टीविषयी कधी सांगितलं होतं का? त्या लोकांनी गारो डोंगराजवळ हत्तीचं पिल्लू पकडलं होतं." आईने विचारलं. कनूला वाटलं की आई एखादी गोष्ट सांगणार आहे. म्हणून तो आईपाशी गेला.

"नाही आई. ते हत्तीचं पिल्लू आता कुठं आहे? त्याचं काय झालं?" त्याने उत्सुक होऊन विचारले.

"मला वाटतं तो कुठंतरी मेहनतीचे काम करीत असावा. हत्ती इतका बहुमूल्य प्राणी आहे की तो कुठेही असला तरी लोक त्याचा संभाळच करतात."

बारा नंबरची सर्वेक्षण पार्टी कनूच्या बाबांची होती. कनूने विचारले,

"बाबांनी तो हत्ती पाहिला का ग?"

"हो, पाहिला होता. खरं तर ते काही हत्ती पकडायला गेले नव्हते. डोंगरात आणि दाट जंगलात वाहणाऱ्या झऱ्याचं माप घ्यायला गेले होते. संध्याकाळी जेव्हा काही लोक कॅम्पवर परत आले तेव्हा त्यांनी एका रानटी हत्तीची बातमी दिली. त्या हत्तीने त्या लोकांचा पाठलाग केला होता. त्या लोकांनी एकच हत्ती पाहिला होता की हत्तीचा कळप पाहिला होता याची तुझ्या बाबांनी चौकशी केली. तेव्हा त्या लोकांनी सांगितलं की कळप काही त्यांना दिसला नव्हता. फक्त एकच हत्ती दिसला होता. असा एकटादुकटा भटकणारा हत्ती बहुधा वेडा झालेला असतो आणि अतिशय भयंकर असतो हे सर्वेक्षणच्या लोकांना माहीत होतं. म्हणून आपापल्या बंदुका घेऊन दोघातिघाच्या गटागटाने लोक निघाले.

दुसऱ्या दिवशी जेव्हा हत्तीने एका छोट्या गटावर हल्ला चढविला तेव्हा त्या लोकांनी हत्तीला गोळी घातली. तो हत्ती बिचारा कोलमडत नदीकाठी जाऊन पडला. त्याच्या दुसऱ्या दिवशी जेव्हा लोकांनी पुन्हा हत्तीचा चीत्कार ऐकला तेव्हा ते आश्चर्याने थक्क झाले. तुझे बाबा काही लोकांना बरोबर घेऊन काय प्रकार आहे ते पाहायला निघाले.

नदीकाठी पोहोचल्यावर त्यांना दिसलं की हत्तीचं एक पिल्लू आपल्या आईला उठवण्याचा प्रयत्न करीत आहे. त्याच्या पायाला जखम झालेली होती आणि ते थोडं लंगडत होतं.

आतां कुठं खरी गोष्ट तुझ्या बाबांच्या लक्षात आली. सर्वेक्षण पार्टीचे लोक आपल्या बाळाला इजा करतील या भीतीने त्या हत्तिणीने लोकांवर हल्ला चढविला होता. मुक्या प्राण्यांच्या मायेचे ते दृश्य पाहून सर्वांची मनं हेलावून गेली. सर्वांना वाईट वाटलं. त्या लोकांनी पिल्लाच्या पायाला पट्टी बांधली, ऊस त्याला चोखायला दिला. नंतर ते त्याला कँपवर घेऊन आले आणि त्याला शिकवू लागले. सुरवातीला त्या हत्तीला नुसता हात जरी लागला तरी अतिशय गुदगुल्या व्हायच्या. त्याचें हे गुदगुल्या होणं कमी व्हवं म्हणून लोकांनी खूप मालिश केलं. तुझे बाबा सांगायचे मालीश करीत असताना तो खूप गडबड करायचा. मालिशमुळे होणाऱ्या गुदगुल्या त्याला सहन व्हायच्या नाहीत. अखेर सवयीने तो ठीक झाला आणि थोड्याफार सामानाची इकडून तिकडे ने-आण करू लागला. त्याला गुदगुल्या व्हायचं देखील बंद झालं.

तो इतका खेळाडू होता की सर्वजण त्याच्यावर प्रेम करायचे. कधी कधी तो गुपचूप झाडामागून येऊन कुणी उभं असलं तर त्याला धक्का द्यायचा. हत्तीसारखा अगडबंब प्राणीदेखील चोरपावलांनी चालू शकतो हे बघून तुला खरोखरच आश्चर्य वाटेल. त्याचं नाव लोकांनी बेबी रघुवीर ठेवलं होतं. अजूनही तो सर्वेक्षणाच्या लोकांपाशी आहे."

बेबी रघुवीर मजेत असला तरी त्याच्या आईचा विचार मनात येऊन कनूला वाईट वाटले. ती बिचारी आपल्या बाळाला वाचवू पाहात होती.

"पण तिच्यामुळे सर्वेक्षणच्या लोकांना धोका होता. बाळाला वाचविण्याच्या नादात तिने त्या लोकांवर हल्ला करायला मागे पुढे पाहिले नसते." नानांनी कनूला समजावले. "ये. मी तुला माकडाच्या पिल्लाची मजेदार गोष्ट सांगतो."

बनारसमध्ये ही घटना घडली. माझी आई बऱ्याच गावकऱ्यांसह तीर्थयात्रेला गेली होती. ही सर्व मंडळी डोंगराळ भागात राहाणारी होती. म्हणून बनारसच्या त्या गल्ल्या, तिथल्या लोकांची गर्दी, गंगेचे दगडी घाट, तिथल्या शेकडो नावा, दुधापासून बनविलेल्या चवदार मिठाया, सारं पाहून त्यांना खूप आश्चर्य वाटलं. पाहण्यासारख्या



सर्व रमणीय जागा त्यांनी पाहिल्या. त्यांनी जे काही पाहिलं ते सारं त्यांना आवडलं देखील. त्यांना फक्त एकच गोष्ट आवडली नाही. ती म्हणजे तिथली माकडं. प्रत्येक जागी त्यांना माकडांचे झुंडच्या झुंड दिसून आले. माकडांनी घरात येऊ नये म्हणून कित्येक ठिकाणी अंगणाला तारेच्या जाळ्यां बांधलेल्या होत्या. माकडांना तिथले लोक हनुमान म्हणायचे. त्यांना पवित्र समजून मारायचे नाहीत.







ही माकडं झाडावरून फळं तोडायची, वाळत, घातलेले कपडे पळवायची, लहान मुलांना वाकुल्या दाखवायची, आणि हे सर्व करण्यात त्यांना खूप गंमत वाटायची. एके दिवशी सकाळी खूप गडबडगोंधळ ऐकायला आला. बघतात तर काय या हनुमान सेनेची आपसात ही लढाई जुंपलेली. माझी आई आणि तिच्या बरोबरीच्या आणखी बायका घाबरून घाईघाईने खोलीत शिरल्या. पण आई दार लावते न लावते तोच एक माकडीण आईला ढकलून खोलीत शिरली. तिच्याबरोबर तिचे पोरदेखील होते. तिने पिल्लू आईच्या मांडीवर टाकले आणि स्वतः गच्चीच्या उंच कटड्यावर उडी मारून क्षणात दिसेनाशी झाली.

ते छोटेसे पिल्लू फार तर महिन्याचे असेल. त्याला अजिबात खाता यायचे नाही. कापसाच्या बोळ्याने दूध पाजले तर तेवढे मात्र तो चोखून घ्यायचा. त्याला सर्वजण हातावर खेळवायचे. थोड्याच वेळात तो झोपी जायचा.

संध्याकाळी त्या पिल्लाच्या आईला दाराशी उभं असलेलं बघून आईला खूप आश्चर्य वाटलं. ती हात जोडून माणसांसारखं मागच्या दोन्ही पायांवर उभी होती आईने ते पिल्लू तिच्या हाती दिलं. पिल्लाला पोटाशी लावून उड्या मारीत ती माकडीण तिथून निघून गेली."



"पण का, नाना?"

"अरे रागीट माकडं कधी कधी लहान पिल्लांना मारून टाकतात हे तुला ठाऊक नाही वाटतं? किंवा त्याच्या शत्रू गटाने त्यांच्यावर हल्ला केला असण्याचीही शक्यता आहे. ते काही असो. आपलं पोर या बायकांच्या हाती सुरक्षित राहील असे त्या माकडणीला वाटले असावे. म्हणूनच ती पिल्लाला आईच्या हाती सोपवून निघून गेली. आणि संकट टळताच पोराला परत घेऊन गेली."

"आता बोला कनूमहाराज. गोष्ट आवडली ना?"

"हो." कनूने उत्तर दिले. आणि आईकडे पळाला. खरंच आई किती चांगली असते.

वर्षाअखेरचे दिवस होते. थंडी वाढत चालली होती. हवा स्वच्छ व निर्मळ होती रात्रीच्यावेळी आकाश असं वाटायचं जणू कुणी कटोराच पालथा ठेवला आहे. त्याचा रंग दाट जांभळा दिसायचा आणि त्याला तारे लावल्यासारखे वाटायचे. ज्या ग्रहनक्षत्रांना स्वतःचा प्रकाश नसून सूर्याच्या प्रकाशामुळे जे सतत चकाकतात ते ग्रह नक्षत्र आई बोटाने दाखवायची. ज्या ताऱ्यांना स्वतःचा प्रकाश असायचा. ते लुकलुकायचे आई सांगायची,

"हे खरं म्हणजे दुसरे सूर्यच आहेत आणि स्वतःची नक्षत्रे देखील आहेत."

"आई तू लहान असताना सोनाली गावाहून देखील हे दिसायचं का ग?"

"हो कनू." आईने विचार करीत उत्तर दिले. तिथून सुद्धा आम्हाला हेच तारे व हीच नक्षत्रे दिसायची. किती आश्चर्याची गोष्ट आहे नाही? आजदेखील तुझी म्हातारी आजी तिच्या घरून हे तारे बघत असेल व आमची आठवण करीत असेल."

"आई, जगात सर्वांना हेच तारे दिसतात का ग?"

"नाही कनू. जगात उत्तरेच्या बाजूला राहणाऱ्या लोकांना हे तारे दिसतात आणि दक्षिणेकडे राहणाऱ्या लोकांना दुसरे तारे दिसतात. आमच्या गावाहून आकाश एकदम निळे दिसते. इथून ते दाट जांभळ्या रंगाचे दिसते. तो बघ, त्या बाजूला तिकडे एक दुधाच्या नदीसारखा पांढराशुभ्र पट्टा आभाळात दिसतोय. अगणित ताऱ्यांनी तो तयार झालेला आहे. त्यालाच आकाशगंगा, आकाशातील गंगा म्हणतात."

कनूने आश्चर्याने म्हटले, ""आई, प्रत्येक वस्तू प्रत्येक ठिकाणी सारखीच असते ना?"

"हो" आईने उत्तर दिले.

"तर मग तुला मुल्की गावापेक्षा सोनाली गाव का जास्त आवडतं?"

"बाळ, तिथे माझा जन्म झाला होता. माझी आई तिथे राहाते म्हणून मला ते जास्त आवडतं."

"आई, तुला सोनाली गावची आठवण येते की आजीची?"

"तू भारीच बाई बडबड करतोस" आई उद्गारली. पण तिच्या ओठावर स्मित झळकत होतं.

थंडी जसजशी वाढत गेली, तसतशी झाडांची पानं गळून पडू लागली. अगोदर त्यांचा रंग पालटून हिरव्याच्या जागी पिवळा झाला. मग त्यात भुरकटपणा आला. नंतर वाऱ्याच्या मंदशा झुळकेने देखील ती गळू लागली. वाऱ्याने इतस्ततः उडून झाडांखाली त्यांचा ढीगच्या ढीग गोळा झाला. त्यांतील काही पाने पिवळी होती, काही भुरकट, काही सोनेरी, काही लाल आणि काही काळ्या रंगाची होती.

बागेचा यूबिन माळी दाताळे घेऊन आला. बागेत पडलेला पालापाचोळा त्याने गोळा केला. त्यामुळे बाग स्वच्छ दिसू लागली. माळ्याने या साऱ्या पाचोळ्याचा घरापासून दूर एक मोठा ढीग केला. नानांनी कनूला बोलावून म्हटले,

"बाळ, इकडे ये. आम्ही होळी पेटविणार आहोत."






सूर्यास्त झाल्यावर यूबिनने त्या ढिगाला आग लावली. थोड्याच वेळात त्यातून मोठमोठ्या ज्वाळा निघू लागल्या. इतक्या मोठ्या की कधी कधी त्या घराच्या लाल छतापर्यंत पोहोचायच्या. आगीमुळे झाडांवर राहणारे कावळे काव काव करीत उडून गेले. नाना हसू लागले.

"या कावळ्यांना वाटत असेल दिवस उगवला." कनूने म्हटले.

"छे, त्यांना वाटतंय रानात आग लागली."

आई खूप अस्वस्थ होती. तिने म्हटले,



"काका, आपल्या घराला तर आग नाही ना लागणार ?"

"मुळीच नाही. युविन दाताळे आणि पाण्याने भरलेली बादली घेऊन उभा आहे. एखादी ज्वाळा इकडे तिकडे जाऊ लागली तर तो लगेच तिला आवर घालील. तू अजिबात काळजी करू नकोस."

ते चौघेजण आगीकडे तोंड वळवून उभे होते. थोड्याच वेळात त्यांचे गाल गरम लाल झाले. पण त्यांच्या पाठी अजून गार होत्या. उतारावरून बऱ्याच मुलांनी आग पेटविलेली पाहिली होती. ते सर्व तिच्या चारी बाजूंना जमले होते. काही मोठी माणसं देखील आली होती. फार काय, डोंगराच्या पायथ्याशी असलेल्या धानखेती-वरून शाम आणि त्याचे वडील देखील आले होते.

आई मुलांसाठी बिस्किटं आणि मोठ्यांसाठी चहा घेऊन आली. शाम त्याच्या बाबांच्या पेल्यातून चहा पीत होता. म्हणून कनूने देखील नानांच्या पेल्यातून चहाचे घुटके घेतले. पण आईला ते आवडले नाही. तिचं म्हणणं होतं की लहान मुलांनी असं मोठ्यांच्या पेल्यांतून चहा घेऊ नये. ती मुलांसाठी छोट्या छोट्या पेल्यांतून चहा घेऊन आली.

सर्व लोक किती आनंदी दिसत होते. हळूहळू ज्वाला कमी होऊ लागल्या. अखेरीस आग विझली. त्यामुळे अचानक थंडी जास्त वाजू लागली. सर्वजण एक-मेकांना 'नमस्कार' करून आपापल्या घरी निघून गेले. आई आणि नानांबरोबर कनू देखील घरात आला. त्यांच्या कपड्यांना अजून जळक्या पाचोळ्याचा वास येत होता. ते सर्व दमले होते पण खूप होते. आज जेवणाचा बेतही मस्त होता. पुऱ्या, तळलेले कांदे आणि बागेतल्या फ्लावरची खमंग भाजी. जेवताना सर्वजण गप्पा मारीत होते.

आई म्हणाली, 'मैदानी प्रदेशात इतकी थंडी पडत नसते. उलट प्रत्येक जण थंडीची वाट पाहात असतो. इथे तर थंडीच्या दिवसांत पानं, फुलं सारं काही सुकून जातं. तिथे तर याच ऋतूत बहर येतो. मात्र आपल्या नाशपातीच्या झाडांसारखीच तिथेही शाल वृक्षाची पानं गळून पडतात. झाडाखाली पाचोळ्याचा हा मोठा ढीग गोळा होतो. दक्षिणेकडून येणाऱ्या वाऱ्यांमुळे ती पानं इकडे तिकडे उडतात त्यामुळे लोकांना खूप शिंका येतात. त्यांना एक मंद असा गोड वास येतो हं! मला त्याची किती आठवण येते."



कनू हे ऐकून नाराज झाला. तो म्हणाला,

"आपल्या नाशपातीच्या झाडांना देखील अशाच प्रकारचा वास येतो ग आई. थंडीनंतर त्यांना किती सुरेख पांढऱ्या रंगाची फुलं येतात. इतकी फुलं येतात की पानं दिसेनाशी होतात. खरं की नाही हो नाना ?"

नानांनी संमतिदर्शक मान हलविली. आणि म्हटलं, "नंतर त्या फुलांच्या पाकळ्या गळून पडतात आणि त्या जागी नाशपातीची छोटी छोटी फळं दिसू लागतात. ही छोटी फळं दगडासारखी टणक आणि चवीला अतिशय कडू असतात. यावेळी पानं त्या फळांना झाकून टाकतात. आणि थंडीपासून त्यांचे रक्षण करतात. हळूहळू फळे मोठी होऊ लागतात, त्यांच्या वजनाने फांद्या वाकतात. तू इकडे कधी लक्ष दिलं आहेस का कनू ? थंडीमुळे ही फळं पिकायला बरेच महिने लागतात."

आई म्हणाली, "सोनालीमध्ये आंब्यांचं देखील असंच होतं. मोहोर गळून गेला म्हणजे पानं फळांना झाकून टाकतात. त्यामुळे पक्षी फळांना टोचे मारू शकत नाहीत आणि उन्हापासून त्यांचं रक्षणही होतं. सगळीकडे हीच तऱ्हा आहे. प्रत्येक ठिकाणी निसर्ग आपल्या मुलांचं रक्षण करतो. जेथे थंडी खूप पडते, अगदी बर्फ पडतो आणि पानंसुद्धा नजरेस पडत नाही तेथे कित्येक प्राणी बिळांमध्ये शिरून झोपी जातात. झाडांची मुळे देखील जमिनीत विश्रांती घेतात. चिमण्या उष्ण देशांकडे स्थानांतर करतात. सोनाली गावी तर हजारो रानटी बदकं आणि चहा नावाच्या चिमण्या अशा येतात. थंडीच्या दिवसांत ती आमच्या गावच्या तलावाकाठी राहातात आणि थंडी संपल्यावर उडून माघारी जातात.

"कनू, चल आता. झोपायची वेळ झाली."

# 8.

हळूहळू दिवस लवकर मावळू लागला. संध्याकाळी चारलाच अंधारू लागलं. पण त्यावेळीसुद्धा दूर लँकोर पर्वताच्या शिखरांवर अस्तास जाणाऱ्या सूर्याची किरणं निरोप घेत असताना दिसून यायची.

"सूर्य अजून मावळलेला नाही." नानांनी सांगितलं.

"यावेळी तो फक्त डोंगराच्या मागे गेला आहे."

सायंकाळ फार मोठी वाटायची. थंडी इतकी असायची की मासे पकडायला जाता येत नव्हते. बाहेर जाऊन पतंग उडविणे देखील शक्य नव्हते. नाना आपली करवत आणि इतर अवजारे घेऊन आले. मऊ लाकडापासून काठ्यांच्या वेगवेगळ्या आकाराच्या मुठी कशा तयार करायच्या हे ते कनूला शिकवू लागले. कुत्र्याच्या व सापाच्या तोंडाच्या आकाराच्या मुठी करून दाखविल्या.


परीक्षा संपल्या होत्या. शाळेला थंडीची मोठी सुट्टी लागली होती. थंडीपासून बचावण्यासाठी काही लोक खालच्या मुलखात निघून गेले होते. कनू आणि नाना— दोघांनाही हा कोरडा हिवाळा अतिशय आवडायचा. त्यातल्या त्यात पहाटेच्या वेळी डोंगरावर सर्वत्र धुकं लकाकताना दिसू लागलं म्हणजे तर ते भलतेच खूष व्हायचे.

"नाना, आभाळातून धुकं पडताना मी कधीही पाहिलं नाही." कनूने म्हटले. "असं कसं होतं? मी झोपी जातो तेव्हा रात्री धुकं पडतं का हो?"

"नाही. धुकं काही आभाळातून पडत नसतं. धुकं म्हणजे दवबिंदू असतात आणि थंडीमुळे ते गोठतात. आपला पर्वत बर्फ पडण्याइतका उंच नाही."

सूर्य उगवताच धुकं विरघळून जायचं.

बैठकीच्या खोलीत भिंतीमध्ये एक मोठी शेगडी बांधलेली होती. त्यात मोठमोठी लाकडं घालून शेकोटी पेटवायचे. सर्वजण त्या शेकोटीभोवती बसूनच जेवायचे. ती जागा चांगली उबदार होती. त्या पेटणाऱ्या लाकडांकडे पाहता पाहता कनू आग लागलेल्या मोठमोठ्या शहरांची कल्पना करायचा. त्याला वाटायचं जणू लढाई सुरू झालेली आहे आणि डोंगरांमधून आगीच्या मोठमोठ्या ज्वाळा निघत आहेत. आगीच्या ज्वाळा निघणाऱ्या डोंगरालाच ज्वालामुखी म्हणतात. नानांनी एकदा ज्वालामुखी पर्वत पाहिला होता.



बाबांचं पत्रं आलं होतं. घरच्या सर्वांबरोबर थंडीचे दिवस घालविण्यासाठी ते येणार होते. त्यांना दोन महिन्यांची सुट्टी मिळाली होती. सर्वांनाच आनंद झाला होता. आईने तर टपालवाल्याला मिठाई आणि चहासुद्धा दिला. हा टपालवाला यूबिनचा पुतण्या होता. मुल्कीगावच्या सर्वांशी त्याची दोस्ती होती म्हणूनच टपाल वाटण्याचं आपलं काम संपवायला त्याला खूप वेळ लागायचा. नाना नेहमी त्याची थट्टा करायचे. ते म्हणायचे,

"त्याचं पोट भरलेलं असतं आणि वरून गरम चहा प्यायला मिळाला म्हणजे मग बघा. कडाक्याच्या थंडीत सुद्धा वाटेल तितकं वर चढून जायला स्वारी एका पायावर तयार असते." त्याचं नाव डोरेन होते.

मधमाश्यांचं पोळं असलेल्या झाडाबद्दल डोरेननेच कनूला सांगितलं होतं. ते झाड रानात होतं. वसंतऋतूमध्ये एकदा सकाळच्या वेळी त्या झाडावरून माश्या उडत असल्याचं डोरेननं पाहिलं होतं. त्याने कनूला त्याच्याविषयी माहिती सांगितली. दोन राणी मधमाश्या कधीही एका पोळ्यात राहू शकत नाहीत. एका पोळ्यात नेहमी एकच राणी माशी असते आणि काही नर मधमाश्या असतात. या नर मधमाश्या

काही काम करीत नसतात. याशिवाय आणखी हजारो मधमाश्या असतात. त्या खूप काम करतात. या मधमाश्या फुलांचे पराग गोळा करून पोळ्यामध्ये आणून ठेवतात, भिंतींसाठी मेण तयार करतात, मुलांसाठी मध बनवितात आणि पोळं स्वच्छ राखतात. राणी फक्त अंडी देण्याचं काम करते. ती आपल्या अंड्यांची वा मुलांची देखील निगा ठेवीत नाहीत. ते काम अन्य मधमाश्यांनाच करावं लागतं.

योगायोगाने जर दुसरी एखादी राणी मधमाशी निर्माण झालीच तर कित्येक नरमाश्या आणि बऱ्याचशा इतर मधमाश्या मिळून एक वेगळा गट करतात. व या नव्या राणीमाशीसह उडून जाऊन नवीन पोळे तयार करतात.

आईला हे सर्व माहीत होते. तिने सोनालीजवळ शालवृक्षांच्या रानात मधमाश्यांचं पोळं असलेलं एका झाड पाहिलं होतं. एक मोठा वठलेला वृक्ष होता. त्याच्या बुंध्याशी एक फार मोठं भोक होतं. त्या झाडाची साल गळून पडली होती. त्याच्या खोडाला जागजागी चिरा पडलेल्या होत्या. आत लागलेलं ते पोळं कुणालाही सहज पाहता येण्यासारखं होतं. कधी कधी त्यातून थोडासा मध बाहेर पडून खोडावरून वाहू लागायचा. मध गोड असल्याने तेथे खूप मुंग्या जमायच्या. या मुंग्या पोळ्यापाशी जात नसत. कारण राखणदारी करणाऱ्या मधमाश्या आपल्याला लगेच मारून टाकतील अशी भीती त्यांना वाटायची.

कनूने जेव्हा हे ऐकलं तेव्हा त्याला खूप बरं वाटलं. मधमाश्यांचं पोळं असलेलं झाड त्यालाही बघायचं होतं.

"आई" तो म्हणाला, "चल आपण सोनालीला जाऊ या."

नाना शेकोटीजवळ बसून शेकत होते. ते म्हणाले,

"इतक्या लांब जायची काय जरूर बाळ? एखाद्या दिवशी मी तुला इथल्याच रानात मधमाश्यांचं पोळं असलेलं झाड दाखवीन. थंडीत या मधमाश्या बाहेर पडत नाहीत. वसंतऋतु येईपर्यंत आपल्याला थांबावं लागेल."

कनूला इतका दम नव्हता. तो म्हणाला, "ऊं हूं. आपण सोनालीला जाऊ या. मला मधमाश्यांचं पोळं बघायचं आहे. वसंतऋतूत वाटल्यास आपण पुन्हा इथलं पोळं पाहू."

पण आई त्यासाठी तयार नव्हती. ती म्हणाली,

"मधमाश्या बाहेरच आल्या नाहीत तर रिकामं पोळं बघून काय करायचं?"





दिवसामागून दिवस जात होते. एके दिवशी दुपारच्या जेवणानंतर आई आणि इतर सर्वजण उन्हात बसले होते. कनू आपल्या नव्या पुस्तकातील चित्रे पाहात होता. हे पुस्तक त्याच्या बाबांनी त्याला पोस्टाने पाठविले होते. त्याच वेळी त्याला नाना बाहेर जायच्या तयारीत दिसले. नानांनी स्वतः विणलेली लोकरीची टोपी घातली होती, अंगात मोठा कोट चढविला होता आणि कोपऱ्यात ठेवलेली काठी घेऊन ते जायला निघाले होते. या टोपीने नानांनी आपले कान व आपला गळा झाकून घेतला होता. या टोपीला ते 'माकड-टोपी' म्हणायचे. कनू एकदम उठून बसला, तो म्हणाला,

"कुठे निघालात नाना? मी पण तुमच्या-बरोबर येणार."

"छे, छे," नानांनी उत्तर दिले. "मी तर रानातील काही झरे बघायला जातोय. तू ते पाहिले आहेस."

“पण तुम्ही देखील ते पाहिले आहेत. हो ना? नाना?” कनूने विचारले.

“होय. तुला तर ठाऊकच आहे की त्या झऱ्याकाठच्या एका झोपडीत मी बरीच वर्षे राहिलो आहे. त्या झऱ्याचं पाणी कुणी घाण करू नये याकडे लक्ष ठेवणं एवढंच माझं काम होतं. पुढे त्याच्या आजूबाजूला उंच उंच भिंती बांधल्या गेल्या म्हणून तिथे कोणी राहात नव्हतं. गेल्या दहा वर्षांपासून मी तिकडे फिरकलोही नाही. एव्हाना त्या भिंती पडल्या असतील. बरं ते जाऊ दे, गुपचूप झोप बघू, नाहीतर तुझी आई रागावेल.” इतकं बोलून ते घाईघाईने बाहेर पडले. त्यांनी एकदासुद्धा मागे वळून पाहिलं नाही.

रानाबाहेरच कनूने नानांना गाठले. त्याला बघून नाना इतके रागावले की लगेच मागे वळून घराकडे चालू लागले. कनूने आपण नानांना पाहिलंच नसल्यासारखं दाखविलं. तो घनदाट अरण्याच्या दिशेने निघाला. नानांना घरीच जायचं असेल तर जाऊ दे. तो मात्र आज रानात जाऊन मधमाश्यांचं पोळं नक्कीच पाहणार. अखेरीस नानांनाच माघार घेऊन कनूपाशी यावं लागलं. ते म्हणाले,

“आता तुझी आई किती रागावेल देव जाणे.”

“ती का रागावेल? बघा ना मी किती



लठ्ठ कोट आणि गरम मोजे घातले आहेत.” मागेही एकदा कनू सहलीसाठी येथे आला होता. त्यावेळी मुल्कीचे सारेच लोक आले होते. त्यांनी खूप गाणंबजावणं, चेष्टामस्करी, खेळ वगैरे केलं होतं. त्यानंतर किती फरक पडला होता. रान आणखीनच दाट झाल्यासारखं, झाडं एकमेकांच्या अधिकच जवळ आल्यासारखं वाटत होतं. भर दुपारची वेळ होती. सूर्य तळपत होता. पण दाट पानांमधून खाली ठिबकणारा त्याचा प्रकाश तुरळकच दिसत होता. रान हिरवेगार आणि विलक्षण दिसत होते. तेथे थंडीही खूप होती.

कनूला देखील थंडी वाजत होती. गरम कोट घातलेला होता तरी तो थरथरत होता. जमिनीला ओल होती. फिक्कट हिरव्या आणि राखी रंगाचं काहीतरी झाडांच्या फांद्यांवर लोंबत होतं. एखाद्या म्हाताऱ्या माणसाच्या दाढीसारखं ते दिसत होतं.

“ही देखील एकप्रकारची रोपंच आहेत. मातीतून पोषण घ्यायच्या ऐवजी झाडांच्या शिरांमधून रस चोखून घेतात. थांब, थांब झुडपांजवळ जाऊ नकोस. त्या



भयंकर प्राण्यांपैकी एखादा तिथे असला आणि त्याने फणा काढला तर?" रानात आल्यावर नाना कधीही सापाचं नाव उच्चारीत नसत.

"का? मला वाटलं होतं की ते थंडीभर झोपून राहातात." कनूने म्हटले.

"खरं आहे. पण डोक्यावरच पाय पडला म्हणजे कसे झोपणार?"

नाना म्हणाले. कनू मागे सरला.

एकाएकी तो कान देऊन ऐकू लागला. दूर कुठून तरी पाण्याचा आवाज येत होता. रानात अनेक प्रकारचे आवाज ऐकू येत असतात. कधी झाडांवरून पक्ष्यांच्या पंखांची फडफड ऐकू येते, तर कधी वारा शीळ घालताना ऐकू येतो. कधी रानकिड्यांची किरकीर कानावर येते, तर कधी छोट्या छोट्या प्राण्यांची धावपळ ऐकू येते. पण या सर्वांपेक्षांही कनूला झऱ्याचं संगीत अधिक आकर्षक वाटायचं. झऱ्यापाशी पोहोचायच्या कितीतरी अगोदरच त्याला लांबून तो आवाज ऐकू यायचा.

"अरे वा, नाना! हा आवाज नक्कीच एखाद्या झऱ्याचा आहे."

"कनू, झरे फार उंचावर आहेत. हा आवाज तर ओढ्याचा आहे. झऱ्याचं सारं पाणी काही पाइपमध्ये येत नाही. तेव्हा जे पाणी जास्त असतं त्याचा ओढा वाहू लागतो. हा ओढा देखील 'बडा पाणी' कडे वाहत चालला आहे. नीट ऐक. हा ओढा जेव्हा खालच्या बाजूला वाहतो तेव्हा कसा विलक्षण आवाज ऐकू येतो. जणू कोणीतरी खळखळून हसत आहे. किंवा मधुर स्वरात गुणगुणत आहे. पाण्यात लहान लहान दगड पडलेले असतात त्यांच्यावरून पाणी सतत वाहत राहिल्याने ते गोल आणि गुळगुळीत होतात. त्यांना गोटे म्हणतात."

जंगलाच्या मध्यभागी आणखी अंधार होता. निःस्तब्धता होती. कनू नानांकडे सरकला.



"ये—माझा हात धर कनू. आता जवळच्या रस्त्याने जाण्यासाठी आपल्याला हा चढ चढायला हवा."

खडकांवर पाय ठेवीत ते तो उंच सरळसोट चढ चढून वर जाऊ लागले. कधी ते हात टेकून चढत, कधी पाय नीट रोवून चढत. कधी हातापायावर रांगत, तर कधी झाडांची मुळे व फांद्या धरीत किंवा जमिनीतील गवताला घट्ट पकडीत वरच्या बाजूला चढत. अखेर ते अतिशय रम्य अशा जागी पोहोचले. ती जागा फारच सुरेख होती. तेथे उंच उंच झाडांची दाटी नव्हती. एकप्रकारे निर्जन अशी ती जागा होती. डोंगरावरील खडकांमध्ये काही विवरं होती. त्यातून पाणी बाहेर पडत होतं. इतक्या उंचीवर कनू कधीही चढला नव्हता. सहलीसाठी ते आले होते तेव्हादेखील नाही. तो आश्चर्यचकित झाला. याच झऱ्यापासून साऱ्या गावाला पाणीपुरवठा होतो? "अरेरे, नाना बघा तरी



किती पाणी वाया चाललं आहे. आता लोकांना प्यायला पाणी कसं मिळणार?"

"अरे वेड्या, हे पाणी काही उगाच वाहात चाललेलं नाही. हे तर खालच्या बाजूला वाहतंय आणि तिकडे 'बडा पाणी' आहे. यातलं काही पाणी जमिनीत मुरून जातं, काही पाणी दिवसभर रानात चरून संध्याकाळी घरी परतणाऱ्या गाईम्हशी, शेळ्यामेंढ्या पितात. याला पाणी वाया जाणं म्हणतात होय? शहरातील लोकांना प्यायचं पाणी ज्यापासून मिळतं ते झरे याहून जास्त उंचावर आहेत."

कनूने वरच्या बाजूला पाहिलं त्याला आणखी काही झरे दिसले. त्याच्या चारी बाजूंना भिंती बांधलेल्या होत्या. वरच्या बाजूला छत घातलेलं होतं. कनू आणि आणि नाना आणखी वर चढले. तिथे जवळ जाऊन पाहिलं तेव्हा कनूला दिसलं, की त्या भिंती छतापर्यंत बांधलेल्या नाहीत. छत आणि भिंती यांच्यामध्ये अर्धा मीटर रुंदीची तारेची जाळी बसविलेली आहे. जाळी चांगलीच मजबूत होती. त्या जाळीतून वारा आत वाहत होता. कनूने जाळीतून डोकावून पाहिले. तिथे आणखीही कित्येक झरे वाहत होते. ते सर्व झरे एकत्र मिळून पुढे नदीचे रूप घ्यायचे. इथूनच मोठमोठ्या काळ्या पाईपांमधून पाणी खालच्या बाजूला न्यायचे. जे पाणी शिल्लक राहायचे ते लहान लहान झऱ्यांच्या रूपाने खालच्या बाजूला वाहायचे. पुढे ते अन्य झऱ्यांना मिळून 'बडा पाण्या'च्या दिशेने वाहायचे. 'बडा पाणी' इथून सुमारे साठ किलोमीटर अंतरावर होते.



## 9

"हे पाईप कुठे जातात नाना?" कनूने विचारले.

"मुल्की गावापाशी एक खूप मोठी पाण्याची टाकी आहे त्यात हे सारं पाणी जमा होतं. तिथून मग दुसऱ्या पाइपांमधून शहराच्या इतर भागांत हे पाणी खेळविलं जातं. पाइपमध्ये असताना हे पाणी जणू कैदेत असतं. ते कधी 'बडा पाण्या'पर्यंत पोहोचू शकत नाही. चल आता घरी जाऊ या. इथे आलं म्हणजे माझं मन फार उदास होऊन जातं." नाना म्हणाले.

"का नाना? तुम्ही उदास का होतां?" कनूने विचारलं.

'कारण खूप वर्षांपूर्वी मी इथे राहात होतो. माझं घर कुठे होतं बघायचं आहे? चल मी दाखवितो.'

समोरच्या सपाट जागेवर चपट्या दगडांचा ढीग पडलेला होता. नाना म्हणाले,

"पाहिलंस? याच दगडांनी माझ्या घराचा पाया घातलेला होता."

नानांनी थोडे दगड इकडे तिकडे सरकवले. तेव्हा त्यांच्या खालून एक लाकडी चेंडू मिळाला. कधी काळी त्या चेंडूचा रंग लाल असावा. पण आता त्याचा रंग फिका पडलेला होता. नानांनी तो चेंडू उचलून कनूला दिला आणि म्हटले,



"घे. आमचं एक छोटंसं बाळ होतं. हा चेंडू मी त्याच्यासाठी बनविला होता. पण तो जगला नाही. चल घरी जाऊ या. खूप उशीर झाला आहे."

ते घरी पोहोचले तेव्हा सूर्य मावळला होता. आई घाबरलेली होती. लँकोर पर्वता-कडे पाहत ती येरझाऱ्या घालीत होती, या दोघांना शोधीत होती. या दोघांना काही झालं की काय याचीच तिला काळजी लागून राहिली होती. म्हणून या दोघांना समोर बघताच तिचा राग अनावर झाला. तिने नानांची खूप खरडपट्टी काढली. कनूलाही चापटपोळीचा प्रसाद दिला. मग अचानक तिला रडायला आलं आणि कनूच्या बखोटीला धरून ती त्याला फरफटत आत घेऊन गेली.

रात्रीच्या जेवायच्या वेळी ती नानांना म्हणाली—"काका, तुम्ही तुमच्या खोलीत जाऊन जेवा. कनू तुमच्याबरोबर असला म्हणजे फार वाह्यातपणा करतो." मग कनू-कडे वळून ती म्हणाली,

"खबरदार, नानांबरोबर कधी कुठे गेलास तर! आणि त्या घाणेरड्या चेंडूला हात लावला तर बघ." इतके बोलून तिने तो चेंडू खिडकीबाहेर फेकून दिला. नाना स्तब्ध उभे राहिले. मग चुपचाप जड पावलांनी आपल्या खोलीत निघून गेले, त्या दिवशी ते जेवले नाहीत.

दुसऱ्या दिवशी सकाळी कनू जागा झाल्याबरोबर नानांच्या खोलीकडे पळाला. नाना तिथे नव्हते. त्यांची काठी, त्यांचं कांबळं आणि त्यांची पेटी देखील तिथे नव्हती. कनू गुपचूप परत आला आणि आपलं पुस्तक काढून त्यातली चित्रं बघू लागला.

थोड्या वेळाने नानांसाठी दूध आणि पाव घेऊन कन्थई त्यांच्या खोलीकडे निघाली. कन्थई स्वयंपाकघरचे काम बघते. कनूने वर पाहून तिला म्हटले,


"नाना हे खाणार नाहीत. ते गेले."

हे ऐकताच आई जेवायच्या खोलीतून धावत बाहेर आली. आणि विचारू लागली 'गेले? कुठे गेले? या म्हातारपणात इतकी वाईट हवा पडली असताना जाणार तरी कुठे?'

कनूचा गळा दाटून आला. कसंबसं म्हणाला,

"'बडा पाणी'कडे गेले असतील. तिथे त्यांना घेऊन जायला नाव येणार आहे. नाहीतर ते आपल्या बायकोला शोधायला गेले असतील. आई, तू तो चेंडू बाहेर





फेकून दिलास ना तो नानांनी त्यांच्या मुलासाठी बनविला होता. त्यांचा मुलगा जगला नाही."

आईचा चेहरा पांढरा फटफटीत पडला. ती सावकाश चालत बागेत गेली आणि तो चेंडू उचलून घेऊन आली. आपल्या साडीने तिने तो चेंडू पुसून स्वच्छ केला आणि म्हटले,

"आता उद्या तुझे बाबा आले आणि त्यांनी नानांविषयी विचारलं तर मी त्यांना काय उत्तर देऊ ?"

"बाबा किनई नानांसाठी रबरी बूट आणणार आहेत. कातडी जोड्यांनी नानांच्या पायांना फोड येतात. शिवाय गरम बनियान देखील आणणार आहेत." बोलता बोलता कनू रडू लागला.

आई उठून खोलीत येरझाऱ्या घालू लागली. मधेच ती पडदे सरकवायची, मधेच सामान इकडे तिकडे उचलून ठेवायची. अखेर ती पुन्हा बसली.

"माझी खात्री आहे की ते नक्कीच 'बडा पाणी'कडे गेले असतील. ते बसने गेलेत काय?" आईने विचारले. कनू हसला. त्याने उत्तर दिले.

'बसने कसे जातील ? त्यांना तर धानखेती झऱ्याच्या काठाकाठाने जावं लागणार आहे. धानखेती झरा पुढे 'बडा पाण्याला' जाऊन मिळतो. आता त्यांची





नाव त्याची वाट पाहात कुठे उभी राहणार आहे कुणास ठाऊक ?"

कनू काय बोलतोय ते आईला समजेना. ती म्हणाली,

"आपण देखील त्या रस्त्याने जाऊ या. आपण त्यांना परत बोलावून आणू या. चूक माझीच आहे. त्यांच्यासारखा माणूस जगात सापडायचा नाही.",

त्यांना तयार व्हायला फारसा वेळ लागला नाही. एका बॅगेत आईनं थोडंफार खाण्यापिण्याचं सामान ठेवलं. एक छडी स्वतःसाठी आणि एक कनूसाठी घेतली. दोघांनी गरम कपडे आणि मजबूत जोडे घातले. कनूने नानांनी दिलेला चेंडू खिशात ठेवला. नानांनी किती प्रेमळपणे तो चेंडू दिला होता. तो सोडून कसं जायचं ?

वरच्या त्या मोठ्या झऱ्याला फाटा फुटून जो छोटा झरा वाहू लागला होता त्यालाच पुढे अनेक लहान लहान झरे भेटले होते. आणि मुल्की गावापाशी येईपर्यंत तो चांगलाच फुगला होता. मुल्कीपाशी येऊन तो झरा दगडाधोंड्यांवरून ठेचाळत, खिंखाळत, नाचत बागडत खालच्या बाजूला धावत होता. डोंगरपायथ्याशी पोहोचून तो आपले हातपाय पसरीत होता. एका अतिशय सुंदर अशा धबधब्यात त्याचे रूपांतर होत होते. हाच धबधबा पुढे जाऊन धानखेती झऱ्याला भेटत होता. आणि दोन्ही झरे हातात हात घालून गाणी गात पुढे जात होते.

ही एक अत्यंत रमणीय जागा होती. नदीकाठी 'फर्न'चे उंचउंच वृक्ष होते. जणू त्यांनी हिरव्यागार छत्र्या उघडल्या होत्या. किनाऱ्यावर एक पाऊलवाटही होती. याच वाटेने त्यांना जायचं होतं.

कनूने सावलीचे एक ठिकाण दाखवीत म्हटले,

"काही लोक इथे मासे धरतात. कधी कधी उन्हाळ्यात जेव्हा पूर येतो तेव्हा मिस्टर होल्डरचे ट्राउट मासे इथपर्यंत पोहत येतात आणि इथून मग धानखेतीच्या झऱ्यात निघून जातात. म्हणून लोक इथेच ते मासे पकडतात."

आईने आश्चर्याने विचारले,

"तुला हे कसं समजलं कनू?"

"नाना मला घेऊन कधी कधी इथे यायचे" कनूने उत्तर दिले.

आईला दम लागला होता. ती म्हणाली,

"थांब. इथे थोडा वेळ विश्रांती घेऊ या. माझ्याच्याने आता अजिबात चालवत नाही. मी अतिशय दमले आहे."

ती एका चपट्या खडकावर जाऊन बसली. तो खडक सकाळच्या उन्हाने गरम झालेला होता. ती आपले गुडघे चोळू लागली. डोंगरावरून उतरताना आपल्या शरीराचं वजन गुडघ्यांवर पडतं आणि ते दुखू लागतात. त्यातल्या त्यात म्हाताऱ्या माणसांचे पाय जास्तच दुखू लागतात. आईचे आणि नानांचे पाय दुखतात. कनूचे पाय मात्र कधीही दुखत नाहीत.

आई विश्रांती घेत होती. कनु इकडे तिकडे पाहू लागला. खडकांमध्ये त्याला एक छिद्र दिसलं. त्याच्या चारी बाजूला पाणी साचलेलं होतं. त्या ठिकाणी पिवळसर रंगाची भुईछत्रं उगवलेली होती. नानांनी सांगितलं होतं की ही छत्रं कांद्याबरोबर भाजून खाल्ली तर फारच चवदार लागतात. पण आई मात्र त्यांना हात देखील लावू देत नाही. त्यांना हात लावल्यास बोटं सुजतील असं तिचं म्हणणं आहे. कधी कधी ही छत्रं खाल्ल्याने लोक मरतात देखील. नानांनीच सांगितलं होतं की काही छत्रं विषारी असतात. लोकांना त्यांची पारख असायला हवी. पंख्या-सारखी ही छत्रं गोड असतात आणि ती खाणं धोकादायक नसतं.

कनूनं विवरात डोकावून पाहिलं. तेथे काही तरी चकाकत होते. तिथे राहणाऱ्या पाणउंदरांचे डोळे होते. मागच्या वेळेला कनूने बघितलं होतं तेव्हा त्याला चार पिलं होती. कनू आणि नानांनी बघितलं होतं तेव्हा त्यांना त्यांचे दात दिसले होते. आता त्याची पिलं मोठी होऊन कुठेतरी निघून गेली असतील. यावेळी उंदरीण कोपऱ्यात एका बाजूला पडली होती आणि डोळ्यांची उघडझाप करीत होती. कनूने



खिशातून काही भुईमुगाच्या शेंगा काढल्या आणि त्या छिद्रापाशी ठेवून दिल्या. लहान प्राण्यांसमोर कोणतीही वस्तू फेकू नये नाहीतर ते धावतात असं नानांनीच सांगितलं होतं.

इथे एक विशिष्ट प्रकारचं गवत उगवतं. त्याचं पातं वस्तऱ्यासारखं धारदार असतं त्याच्यावर जांभळ्या रंगाच्या रेषा असतात. ते जर हातावर चोळलं तर त्यातून अति-शय गोड असा वास येतो. आईला तो वास खूप आवडला. तिने कधीही या गवताकडे लक्ष दिलं नव्हतं. तिथे जंगली लिलीची फुलं देखील उगवलेली होती. पानाखाली थोडासा फेस पडलेला होता. आई म्हणाली,

"शी, इथे कुणीतरी थुंकलं आहे. कनू फेकून दे ते." कनू हसून म्हणाला,



"आई, अग तुला माहीत नाही का ? ही थुंकी नव्हे. या फेसाच्या आत एक छोटासा किडा आहे. त्याने आपल्या शरीरातून फेस काढून आपल्या चहूबाजूला तो लावून ठेवला आहे. आत तो किडा लपून बसलेला आहे. त्यामुळे पाली व चिमण्यांना तो दिसून येत नाही. व त्याचे रक्षण होते."

एक दीर्घ निःश्वास सोडून आई म्हणाली,

"नानांनीच हे सारं तुला सांगितलं असेल. तुझ्या बाबांना देखील त्यांनी हे सर्व सांगितलं होतं. . त्यांना देखील ही सर्व ठिकाणं चांगली माहीत होती. चल आता जाऊ या नाही तर नानांची गाठ पडणार नाही. उद्या तर तुझे बाबा देखील येणार आहेत."

कनू आनंदला. लगबगीने चालत म्हणाला,





"लवकर चल आई. नाना खूप चतुर आहेत. एव्हाना ते कितीतरी लांब निघून गेले असतील."

त्यांना तहान लागली होती. नदीकाठच्या गवतावर ओणवून ओंजळीने ते गार पाणी प्यायले आणि पुढे निघाले. काही ठिकाणी रस्ता स्वच्छ आणि गुळगुळीत होता तर काही ठिकाणी उंचसखल. कनू पुढे पुढे जात होता आणि मग थोडा वेळ थांबून आईची वाट पाहत होता. कित्येकदा त्याला आईचा हात धरावा लागत होता.

ऊन डोक्यावर आलं होतं. सकाळपासून चालून चालून ते दमले होते. पण काही झालं तरी नानांना घेतल्याशिवाय घरी जायचं नव्हतं. शिवाय परतताना त्यांना नुसता चढच लागणार होता. दोघंही पार थकून गेली होती. त्यांच्यात वर चढण्याची अजिबात ताकद उरली नव्हती.

आईला बिचारीला अतिशय दम लागला होता. ती म्हणाली, "ते कोणत्या वाटेने गेले कुणास ठाऊक? कदाचित या बाजूला आलेच नसावेत."

"नाही ग आई! ते नक्कीच या वाटेने गेले असतील. आपला धानखेत झरा मागे लंपेरिंगला मिळाला होता. दुसरे झरे देखील त्याला मिळाले आहेत. पण सर्व झरे अखेरीस 'बडा पाणी' कडेच जातात. कोणत्याही एका झऱ्याच्या काठाकाठाने गेलं म्हणजे आपण 'बडा पाणी'पर्यंत पोहोचू शकतो. नानांची नाव तिथेच त्यांची वाट पाहत उभी आहे." कनूने म्हटले.

ते ऐकून आई देखील झपझप पावले टाकीत कनूबरोबर चालू लागली. तिचा चेहरा लालबुंद झाला होता. केस विसकटले होते. संध्याकाळपर्यंत ते चालतच राहिले. अखेरीस ते मुगमी येथे पोहोचले. या ठिकाणी झरा तीनशे फूट खोल दरीमध्ये झेप घेत होता. आई तिथे जाऊन थांबली. तिने विचारले,

"आता?"

कनूने हसून एक पाऊलवाट दाखविली. ती वाट धबधब्याच्या बाजूने खालच्या बाजूला जात होती. तो म्हणाला,

"बघ. आई, आपल्याला त्या वाटेने खाली जायचं आहे. पण तुझे गुडघे दुखत आहेत. तुला चालता येईल का?"

"छे, छे. माझे गुडघे आता बरे आहेत." आणि ती धावल्यासारखी घाईघाईने कनूबरोबर चालू लागली. धबधब्याचा आवाज इतका मोठा येत होता की दोघांना एकमेकांचे बोलणे ऐकू येत नव्हते. पाण्याचे तुषार त्या दोघांच्या केसांवर व भिवयांवर उडत होते. पायाखालची जमीन हादरल्यासारखं वाटत होतं. दोघेही गुपचूप खालच्या बाजूला उतरू लागले. एक पाऊल जरी चुकलं तरी संकट कोसळणार होतं. आई



मध्येच थांबून चकित दृष्टीने आजूबाजूला पाहत होती. मोठमोठाले खडक, उंच उंच वृक्ष आणि गर्द निळ्या रंगाचं निरभ्र आकाश. असं वाटत होतं जणू एखादं सुरेख चित्रच रेखाटलेलं आहे. अखेर दोघंही धबधब्याच्या खालच्या बाजूला पोहोचली.

वरून कोसळणारं पाणी फेसाळून पुढे धावत होतं. वर उडणाऱ्या थेंबांचा जणू ढग तयार झाला होता. त्यावर सूर्याचे किरण पडून इंद्रधनुष्याचे अद्भुत रंग दिसत होते. कनू तेथे स्तब्ध उभा राहिला.

अचानक देवदार वृक्षांच्या दाट अरण्यातून नाना बाहेर येताना दिसले. त्यांच्या हातात काहीतरी होतं.

"नाना, नाना, नाना" हाका मारण्याचा सपाटा लावून कनू पळत सुटला. त्याने नानांच्या कमरेला मिठी मारली. आईने त्यांच्या पायांवर लोळण घेतली आणि हुंदके देत म्हणू लागली.


"काका, माझं चुकलं. मला क्षमा करा."

नाना नाराज होऊन म्हणाले, "ऊठ ऊठ. ही काही रडायची वेळ नाही. बघ तर या जंगली कोंबड्याला

किती दुखापत झाली आहे. मूर्ख शिकारी पुन्हा या बाजूला आले वाटतं. लवकर लवकर लाकडी पट्ट्या तयार करा."

नाना एका खडकावर बसले. त्यांच्या मांडीवर तो सुरेख कोंबडा डोळे मिटून पडला होता. रुमालाने ते कपाळावरचा घाम पुशीत होते. आईच्या बॅगेत दोरा, कागद कापायचा चाकू आणि काही कपडे होते. कनू लाकडाच्या ढलप्या घेऊन आला. कोंबडा बिचारा गुपचूप डोळे मिटून नानांच्या मांडीवर पडला होता. कनूने म्हटलं,

"अरेरे. नाना, हा तर मेला वाटतं."





नानांनी त्याला धमकावले, "ए गडबड करू नकोस. गुपचूप काम कर. याला घट्ट धर बघू. मी ढलपं बांधतो."

जंगली कोंबडा दिसायला भलताच सुरेख होता. सोनेरी, नारिंगी, निळ्या आणि हिरव्या रंगाच्या रेघा त्याच्या गळ्याभोवती होत्या. त्याचे पंख चकाकणाऱ्या पिवळ्या रंगाचे होते. त्याने हळूच आपले डोळे उघडले. कनू आनंदाने नाचू लागला. नानांनी त्या कोंबड्याला आपल्या कांबळ्यात गुंडाळले आणि आईला म्हटले, "धर याला. मी माझं सामान घेऊन येतो." कनू त्यांच्याबरोबर रानाच्या सीमेपर्यंत गेला. तेथे एका झाडावर त्यांचा जाडजूड कोट, टोपी आणि बॅग लटकावलेली होती. सामान घेऊन नाना आईपाशी आले.

"हं. चला आता घरी." नानांनी म्हटले.

आईने उसासा सोडून म्हटले, "घरी? काका, आता घरी कसं जायचं? घर तर खूप दूर आहे. आणि माझ्याने तर एक पाऊलसुद्धा उचलवत नाही."

"काय मूर्खासारखी बडबडतेस! घर कधी दूर नसतं. त्या वळणदार रस्त्याच्या मागे एक रुंद रस्ता आहे. तेथे बस येते. ती आपल्याला मुल्की गावापर्यंत घेऊन जाईल. ही बस मुल्कीपासून बडापाणीपर्यंत जाते. मी याच बसने आलो होतो."

क्षणभर त्यांच्याकडे पाहून नानांनी विचारलं, "तुम्ही पायी आलांत?"

आईला स्तब्ध बसलेली पाहून नानांनी कनूला विचारले,

"काय रे माझ्या लेकीची तू अशीच देखरेख ठेवणार वाटतं?" कनूने मान खाली घातली.

नंतर नानांबरोबर बसमध्ये बसल्यावर कनू म्हणाला,

"नाना तुमची नाव तुमची वाट पाहात कुठे थांबली आहे ते आम्हाला माहीत नव्हतं. म्हणून आम्हाला पायी यावं लागलं."

नानांनी आश्चर्याने विचारले,

"कोणती नाव? ही काय नावेबिवेबद्दल बोलायची वेळ आहे? मी नावेतून निघून गेलो तर या कोंबड्याला कोण सांभाळील? हा बरा झाला म्हणजे चोच मारू लागेल.





शिवाय तुझे बाबादेखील उद्या येणार आहेत ना? आपण त्यांच्याबरोबर मासे धरायला जाणार आहोत. नावेबद्दल काहीएक बोलू नकोस."

संध्याकाळी सर्वजण घरी पोहोचले. कोंबड्याला त्यांनी एका टोपलीत ठेवले. आणि त्याला ऊब मिळावी म्हणून ती टोपली शेकोटीजवळ ठेवून दिली. कन्थईने गरम गरम जेवण तयार ठेवले होते. यूविन इकडे तिकडे भटकत होता. घरात दिवे लावलेले होते. सर्वजण प्रसन्नचित्ताने घरात दाखल झाले.

दुसऱ्या दिवशी, बाबा घरी आले. त्यांनी आपल्याबरोबर खूपशा वस्तू आणल्या होत्या. पण त्या सर्वांपेक्षां जास्त आश्चर्याची आणि आनंदाची गोष्ट म्हणजे ते आजीलाही आपल्याबरोबर घेऊन आले होते. आजी खूप आनंदात होती आणि हसून सर्वांशी बोलत होती.

कनूने आजीला सांगितलं की आईला मुल्की गावापेक्षा सोनाली गावच अधिक आवडतं. तेव्हा आजीने आईला विचारलं, "का ग?"

आईने उत्तर दिलं, "मला आपल्या घराची आठवण येते."





"घर? जो माणूस जिथे राहतो तेच त्याचं घर. इथे शेजारी तुमचे मित्र आहेत. हेच तुमचं घर. काही दिवसांसाठी माझं देखील हेच घर राहणार आहे. तुझे धाकटे काका आता सेवानिवृत्त झालेत. ते घराची देखरेख ठेवतील. तू म्हणत असशील तर मी काही दिवस इथे राहीन. मला ही जागा फार आवडली आहे."



Printed at : Salasar Imaging Systems, Delhi-110035